रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३२९
www.ramprahar.com
◆ बुधवार, १७ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

कातळशिल्प संवर्धनासाठी सामंजस्य करार/२
अस्मिता पवार होणार पोलादपूरच्या नगराध्यक्ष/५
पिंच्याक सिलॅट स्पर्धेत रायगडची दमदार कामगिरी/८

## महाराष्ट्र पोलीस दलासाठी केंद्राकडून विशेष निधी



**मुंबई :** महाराष्ट्र पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र सरकारने मंगळवारी ७३३.२८ कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर केला. वाढते सायबर गुन्हे, अंमली पदार्थांचे (ड्रग्ज) आव्हान आणि सागरी सुरक्षेचा वाढता विस्तार लक्षात घेता महाराष्ट्र पोलीस दलाला अधिक सक्षम आणि सुसज्ज करण्यासाठी हा निधी वापरला जाणार आहे. या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानले. या महत्त्वाकांक्षी योजनेच्या एकूण ७३३.२८ कोटी रुपयांच्या खर्चात ६० टक्के हिस्सा केंद्र सरकार उचलणार असून उर्वरित ४० टक्के निधी राज्य सरकारकडून दिला जाणार आहे. यामुळे सागरी सुरक्षा, ड्रग्जविरोधी मोहिम, सायबर सुरक्षा, आधुनिक शस्त्रे, वाहने सुसज्ज करण्यास मदत होणार आहे.

# कॅबिनेट बैठकीत विविध निर्णय

### स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जात वैधता प्रमाणपत्रासाठी मुदतवाढ



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक मंगळवारी (दि.१६) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत पार पडली. या बैठकीत सहा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडून आलेल्या उमेदवारांसाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गासाठी राखीव जागांवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची अंतिम मुदत वाढ मिळणार आहे. याबाबतच्या अधिनियमात तशी सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

जात पडताळणी समित्यांकडील अपुरे मनुष्यबळ, तसेच जनगणनेच्या कामकाजासाठी शासकीय व निमशासकीय शाळांतील शिक्षकांची नियुक्ती करण्यात आल्याने अनेक प्रकरणांमध्ये आवश्यक शालेय व गृह चौकशी वेळेत पूर्ण होण्यास अडचणी निर्माण होत आहेत. परिणामी राखीव जागांवरून निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात विलंब होत आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सन २०२५-२६मध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांना आणखी सहा महिन्यांची आणि अंतिम मुदतवाढ देण्यात येणार आहे.

संशोधन व विकास, नवोक्रम, उत्पादन, उपयोजन तसेच देखभाल, दुरूस्ती व पुनर्बांधणी या क्षेत्रात स्वयंचलित प्रणाली राबविता यावी यासाठी महाराष्ट्र स्वयंचलित प्रणाली धोरण २०२६ निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली. या धोरणामुळे ड्रोन, रोबोटस, स्वयंचलित वाहन यांच्या निर्मिती क्षेत्राला तसेच ही उपकरणे चालविता येतील यासाठीचे प्रशिक्षण, अभियांत्रिकी, तसेच संशोधन विकास प्रकल्पांना चालना मिळणार आहे.

ग्रामपंचायत स्तरापर्यंत ऑप्टिकल फायबरद्वारे सक्षम व दर्जेदार ब्रॉडबॅण्ड बॅकबोनची उभारणी करून राज्यात सुधारीत भारतनेट कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी 'महानेट डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लि. विशेष हेतू कंपनी एसपीव्ही स्थापन करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

सामान्य प्रशासन विभागातून माहिती व जनसंपर्क आणि राजशिष्टाचार असे दोन स्वतंत्र विभाग नव्याने निर्माण करण्यास यावेळी मंजुरी देण्यात आली. गत मंत्रिमंडळ बैठकीचे इतिवृत्त कायम करताना हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आता राज्याच्या ३३ प्रशासकीय विभागांच्या विभाजन-समावेशनानंतर आता स्वतंत्र असे ४६ विभाग अस्तित्वात येणार आहेत.

### महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण जाहीर

राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासाठी प्रभावी व कायमस्वरुपी उपाययोजनांवर भर देणाऱ्या महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण २०२६ला मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. या धोरणानुसार राज्यात राबविण्यात येत असलेल्या जलजीवन मिशन २.०मधील योजनांच्या देखभाल दुरूस्तीसाठी सर्वंकष असा आराखडा तयार केला जाणार आहे तसेच ग्रामीण भागात विविध योजनांचे एकत्रिकरण करून धोरण राबविण्यात येईल.

# रायगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी समन्वित कृती आराखडा तयार करा

### सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांचे यंत्रणांना निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड किल्ल्याच्या संवर्धन व विकासासाठी राज्य शासनाकडून निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. विविध यंत्रणांनी समन्वय वाढवून कामांना गती द्यावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले.



रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणाची बैठक मंगळवारी (दि.१६) सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. शेलार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला रोजगार हमी योजना, फलोत्पादनमंत्री भरत गोगावले, प्राधिकरणाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्यासह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी रायगड किल्ल्यावरील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, कचरा व्यवस्थापन, दिशादर्शक फलक, पर्यटक सुविधा तसेच आपत्ती व्यवस्थापन आराखडा या विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

रायगड या ऐतिहासिक आणि जागतिक वारसा स्थळासाठी प्रभावी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा उभारणे आणि मूलभूत सुविधांची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. 'युनेस्को'च्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीतील हा महत्त्वाचा किल्ला असल्याने सर्व विकासकामे जागतिक निकषांचे पालन करूनच करावी लागतील, मात्र वारसा संवर्धनाच्या मर्यादा सांगून आवश्यक पायाभूत सुविधा प्रलंबित ठेवता येणार नाहीत. यासाठी पुरातत्त्व विभाग, राज्य पुरातत्त्व विभाग, जिल्हा परिषद आणि स्थानिक प्रशासन यांनी समन्वयाने काम करावे, असे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले.

यावेळी मंत्री ॲड.शेलार यांनी सर्व संबंधित विभाग, तज्ज्ञ व हितधारकांशी चर्चा करून रायगडवरील प्रलंबित कामांची विभागणी, अडचणी, जबाबदाऱ्या आणि पुढील कृती आराखडा महिनाभरात सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिवांना दिले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक घेऊन पुढील निर्णय घेतले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## महिला बचत गटांना सरकार देणार जमीन

**मुंबई :** राज्यातील ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. सरकारच्या निश्चित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या पात्र महिला बचत गटांना व्यवसाय आणि शेतीसाठी सरकारकडून अडीच एकर जमीन देण्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे.

सरकारच्या या धोरणामुळे ग्रामीण भागातील महिलांना हक्काची रोजगार निर्मिती उपलब्ध होणार असून या जमिनींवर उत्पादक उपक्रम सुरू करण्यासाठी सरकारकडून एक लाख रुपयांचे आर्थिक अनुदानही दिले जाणार आहे.

# उरणमधील एसएच १०३ रस्त्याच्या रूंदीकरणाला मंजुरी

**उरण : रामप्रहर वृत्त**



### आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्याला यश

द्रोणागिरी नोड येथील जेएनपीए टाउनशिप गेटसमोरील राज्य महामार्ग (एसएच) क्रमांक १०३ रस्त्याच्या रूंदीकरण कामाला अखेर प्रशासकीय मंजुरी मिळाली असून आमदार महेश बालदी यांनी सिडकोकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. त्यामुळे उरण रेल्वेस्थानकापासून बोकडविरा ते जेएनपीए टाऊनशिप गेटसमोरील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमचा सुटणार आहे.

द्रोणागिरी नोड, जेएनपीए बंदर, औद्योगिक क्षेत्र तसेच टाउनशिपकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो, मात्र रस्ता अरूंद असल्याने या ठिकाणी वारंवार वाहतूक कोंडी होत होती. विशेषतः अवजड वाहनांच्या मोठ्या प्रमाणातील वर्दळीमुळे नागरिकांना तसेच वाहनचालकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत होते. या समस्येची गंभीर दखल घेत आमदार महेश बालदी यांनी संबंधित शासकीय विभागांकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांची दखल घेत संबंधित विभागाने अखेर या कामासाठी सकारात्मक निर्णय घेतल्याचे समोर आले आहे.

या रस्त्याचे रुंदीकरण झाल्यानंतर वाहतुकीची क्षमता वाढणार असून कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे तसेच अपघातांचे प्रमाण घटून जेएनपीए बंदर आणि औद्योगिक क्षेत्राकडे होणारी वाहतूक अधिक सुरक्षित व सुरळीत होणार आहे.

या निर्णयाचे स्थानिक नागरिक, व्यापारी वर्ग आणि वाहनचालकांनी स्वागत केले असून दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागल्याबद्दल आमदार महेश बालदी यांचे आभार व्यक्त केले आहेत. सिडकोकडून संबंधित कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची अपेक्षा आमदार महेश बालदी यांनी व्यक्त केली आहे.

## निवडक

### दहशतवाद्यांच्या नेटवर्कचा पर्दाफाश; सात जण ताब्यात

**नवी दिल्ली :** पोलिसांच्या विशेष पथकाने पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांच्या नेटवर्कचा पर्दाफाश करत सात जणांना ताब्यात घेतले आहे. शहाजाद भट्टी व त्याचा साथीदार अजमल गुज्जर भारतात नेटवर्क चालवत होते. पाकिस्तानहून पंजाबमार्गे शस्त्रे, काडतुसे, अमली पदार्थ दिल्लीत पुरवले जायचे. या प्रकरणी सात जणांना अटक करून शस्त्रास्त्रे, मोबाइल, कार जप्त करण्यात आली आहे.

### नीट फेरपरीक्षेपूर्वी नवे तक्रार पोर्टल सुरू

**नवी दिल्ली :** नीट यूजी पुनर्परीक्षेला अवघे काही दिवस शिल्लक असताना नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए)ने सोशल मीडियावरील पेपरफुटीच्या अफवा, बनावट वेबसाइट आणि तोतया अधिकाऱ्यांना आळा घालण्यासाठी एक खास तक्रार पोर्टल सुरू केले आहे. २१ जून रोजी होणाऱ्या फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# तरुणीची हत्या करून तरुणाची आत्महत्या

### रोह्याच्या निडी येथील धक्कादायक घटना

**रोहा, धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील निडी गावात तरुणीचा गळा आवळून खून केल्यानंतर आरोपी तरुणाने स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तन्वी गणेश ताडकर (वय २०, रा. निडी, ता. रोहा) आणि रोहित जनार्दन पाटील (वय २७, रा. निडी) हे दोघे सोमवारी रात्री निडी येथील लक्ष्मण दुर्गाजी गडेकर यांच्या घरात होते. रात्री सुमारे ८.१५ वाजण्याच्या सुमारास दोघांमध्ये कोणत्या तरी कारणावरून वाद झाला. या वादातून संतप्त झालेल्या रोहित याने तन्वीला मारहाण करून नायलॉनच्या दोरीने तिचा गळा आवळला. यात तिचा मृत्यू झाला. त्यानंतर रोहितने याच घरातील हॉलमध्ये पंख्याला नायलॉनची दोरी बांधून गळफास घेत आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

ही घटना मंगळवारी (दि.१६) सकाळी उघडकीस आल्यानंतर गावात एकच खळबळ उडाली. संबंधित घराचे मालक लक्ष्मण गडेकर यांचे दोन वर्षांपूर्वी निधन झाले असून त्यांचा मुलगा नोकरीनिमित्त परदेशात आहे, तर कुटुंबातील इतर सदस्य ठाणे येथे वास्तव्यास आहेत. घराची देखभाल तन्वीच्या आईकडे असल्याने घराची चावी त्यांच्याकडे असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त कार्यभार असलेले उपविभागीय पोलीस अधिकारी तथा पाली पोलीस ठाण्याचे निरीक्षक शेरेकर आणि रोहा पोलीस ठाण्याचे निरीक्षक मारुती पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. याप्रकरणी नामदेव मनोहर मढवी यांच्या फिर्यादीवरून रोहा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून सखोल तपास सुरू आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

### पनवेलमधील खिडूकपाडा शाळेत कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाचा एक भाग म्हणून मंगळवारी (दि.१६) पनवेल तालुक्यातील खिडूकपाडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

भाजप नेते प्रभुदास भोईर यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. यावेळी विद्यार्थ्यांना वह्या, दप्तर आणि इतर शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रभुदास भोईर यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. "प्रभुदास भोईर यांनी नेहमीच विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आपला वेगळा ठसा उमटवला आहे. समाजातील गरजू घटकांसाठी ते सातत्याने कार्यरत असतात. त्यामुळेच या उपक्रमाला शुभेच्छा देण्यासाठी मी उपस्थित राहिलो आहे," असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला नगरसेवक शशिकांत शेळके, महादेव मधे, नगरसेविका प्रतिभा भोईर, दमयंती भोईर, निलेश भोईर, सुरेश भोईर यांच्यासह ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अलिबागच्या प्रणव पुजारीने रचला इतिहास!

### जागतिक फिटनेस मॉडेल प्रो गटात विश्वविजेतेपद

**अलिबाग : प्रतिनिधी**



इंडोनेशियातील बाली येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित वर्ल्ड फिजिक गेम्स या नैसर्गिक शरीरसौष्ठव स्पर्धेत अलिबागचा प्रणव पुजारी याने फिटनेस मॉडेल प्रो गटात प्रथम विजेतेपद पटकाविले. त्याच्या या यशामुळे भारताच्या नैसर्गिक शरीरसौष्ठव क्षेत्रात एक नवा इतिहास रचला गेला आहे.

प्रणव पुजारीच्या या ऐतिहासिक यशामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात आनंदाचे वातावरण असून त्याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

"या यशाचे श्रेय मी माझ्या आईवडिलांना देतो. विशेषतः माझी आई, जिने लहानपणापासून मला सर्व काही दिले आणि प्रत्येक टप्प्यावर साथ दिली. माझ्या बहिणीने, मित्रांनी प्रोत्साहन दिले. प्रशिक्षकांनी योग्य मार्गदर्शन दिले. यामुळेच मी हे यश मिळवू शकलो", असे प्रणवने सांगितले.



**पनवेल : महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे घेण्यात आलेल्या बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम-सीईटी २०२६ परीक्षेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा विद्यार्थी ओजस उदय पवार याने १०० टक्के गुण मिळवत महाराष्ट्रातील अव्वल पाच विद्यार्थ्यांमध्ये स्थान पटकावले, तर रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ओजसचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, प्राचार्य राज अलोनी आदी उपस्थित होते.**




# कातळशिल्पांच्या वैज्ञानिक संवर्धनासाठी सामंजस्य करार

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणातील जागतिक महत्त्वाच्या कातळशिल्पांच्या वैज्ञानिक अभ्यास, डिजिटल दस्तऐवजीकरण आणि संवर्धनासाठी पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय आणि आयआयटीएम प्रवर्तक टेक्नालॉजी फॉऊडेशन, चेन्नई यांच्यात इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार झाला.



मंत्री ॲड. शेलार यांच्या मंत्रालयीन दालनात मंगळवारी (दि.१६) झालेल्या या करारामुळे कातळशिल्पांवरील संशोधन माहिती, डिजिटल अभिलेख, नकाशे, प्रतिमा आणि तांत्रिक साधनसंपत्तीचा प्रभावी वापर होऊन वारशाच्या जतन व संवर्धनाला चालना मिळणार आहे. यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.

पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाने रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुमारे ८० गावांमध्ये सर्वेक्षण करून आतापर्यंत जवळपास दोन हजार कातळशिल्पे प्रकाशात आणली आहेत. प्रामुख्याने प्रागैतिहासिक कालखंडातील या कातळशिल्पांमध्ये हत्ती, एकशिंगी गेंडा, कासव, पाणघोडा, पक्षी, मानवी आकृत्या तसेच अनेक अनाकलनीय आकृत्यांचा समावेश आहे.

कोकणातील या अनमोल पुरातत्त्वीय आणि सांस्कृतिक वारशाचे महत्त्व लक्षात घेऊन देवीहसोळ, कशेळी, रुंढे तळी, उक्षी, बारसू, जांभरूण, देवाचे गोठाणे, कुडोपी आणि गोवा राज्यातील फंसाईमाळ या नऊ कातळशिल्प स्थळांचा समावेश 'युनेस्को'च्या जागतिक वारसा नामांकनाच्या तात्पुरत्या यादीत करण्यात आला आहे.

या करारामुळे प्रकल्पातून तयार झालेला डेटा, संशोधन अहवाल, नकाशे, डिजिटल दस्तऐवजीकरण आणि अभिलेख यांचे परस्पर आदान-प्रदान सुलभ होणार आहे. प्रकल्पासाठी वापरण्यात आलेली तांत्रिक उपकरणे आणि संशोधन साधने संचालनालयाकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुलभ होईल. याशिवाय कातळशिल्पांवरील पुढील संशोधन, शैक्षणिक सहकार्य, संयुक्त प्रकाशने, या उपक्रमांना प्रोत्साहन मिळणार आहे.

# राज्यात नव्या प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांचा मार्ग मोकळा

## परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचा महत्त्वपूर्ण निर्णय

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील नागरिकांना परिवहन विभागाच्या सेवा अधिक जलद, सुलभ आणि त्यांच्या जवळ उपलब्ध करून देण्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या नेतृत्वाखाली मोठा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्रात वाढती वाहनसंख्या, नागरिकांची वाढती गरज आणि प्रशासनावरील ताण लक्षात घेऊन नवीन प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालये स्थापन करण्यासाठी निकष निश्चित करण्यात आले आहेत. परिवहन विभागाने यासाठी नियुक्त केलेल्या तज्ज्ञ समितीने सादर केलेला अहवाल शासनाकडे पाठविला असून, त्यामधील शिफारसींना तत्त्वतः मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू आहे.



या निर्णयामुळे राज्यातील दुर्गम व वाढत्या शहरी भागांतील नागरिकांना वाहन नोंदणी, ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन तपासणी, कर भरणा आणि इतर सेवांसाठी दूरच्या कार्यालयांवर अवलंबून राहावे लागणार नाही. नवीन कार्यालय स्थापन करण्यासाठी वाहनसंख्या, लोकसंख्या, महसूल, भौगोलिक अंतर आणि उपलब्ध पायाभूत सुविधा यांसारखे स्पष्ट निकष निश्चित करण्यात आले आहेत. प्रस्तावित कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात किमान चार तालुके, पाच लाखांहून अधिक वाहने, सात लाखांहून अधिक लोकसंख्या आणि वार्षिक १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल असणे आवश्यक राहणार आहे.

याशिवाय विद्यमान परिवहन कार्यालयापासून ५० किलोमीटरपेक्षा अधिक अंतर असलेल्या भागांना प्राधान्य देण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी पूर्ण कार्यालयाची आवश्यकता नसेल, तेथे नागरिकांच्या सोयीसाठी स्वयंचलित वाहन तपासणी केंद्र (ATS) आणि स्वयंचलित वाहन चालक चाचणी केंद्र (ADTT) उभारण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.

"राज्यातील नागरिकांना दर्जेदार आणि वेळेत सेवा मिळणे हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. वाहनसंख्येत झालेली मोठी वाढ लक्षात घेता परिवहन विभागाची यंत्रणा अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. नवीन कार्यालयांमुळे नागरिकांचा वेळ, खर्च आणि गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होईल."

नवीन प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांच्या स्थापनेमुळे प्रशासनिक सुविधा वाढण्याबरोबरच स्थानिक पातळीवर रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सेवा केंद्रांमुळे परिवहन व्यवस्थापन अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम होण्यास मदत होणार आहे. राज्यभरातील वाढत्या गरजा लक्षात घेऊन परिवहन विभागाच्या विस्ताराचा हा निर्णय नागरिकांसाठी दिलासादायक ठरणार असून, महाराष्ट्राच्या परिवहन व्यवस्थेला अधिक सक्षम आणि लोकाभिमुख बनविण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# जीवाची पर्वा न करता माकडिणीने वाचविले पिल्लाचे प्राण

**माथेरान : बातमीदार**

माथेरानमधील ई-रिक्षा स्टँडजवळ असलेल्या विद्युत ट्रान्सफॉर्मरवर एक माकडाचे अगदी लहान पिल्लू वर चढत उड्या मारू लागले. त्या लहान जीवाला विजेचा शॉक लागण्याचा धोका होता. त्याच्या जिवावर बेतले होते. आपले लेकरू संकटात असल्याचे लक्षात येताच मादी माकडाने क्षणाचाही विलंब न लावता पिलाकडे धाव घेत त्याला सुरक्षित ठिकाणी हलवले. आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या पिल्लासाठी धाव घेणाऱ्या आईची धाडशी झुंज तिथे उपस्थित सर्वांनी आपल्या मोबाईलच्या कॅमेऱ्यात कैद केली.



माथेरान ई-रिक्षा स्टँड जवळ एक भले मोठे विद्युत ट्रान्सफॉर्मर आहे. या विद्युत ट्रान्सफॉर्मरपासून काही अंतरावर माकडांचा एक ग्रुप खेळत होता.यावेळी या मधील एक माकडाचे लहानगे पिल्लू उड्या मारत ट्रान्सफॉर्मरवर पोचले.माथेरान ई-रिक्षा स्टँड जवळील हजारो व्होल्ट क्षमतेच्या विद्युत ट्रान्सफॉर्मरवर चढून ते माकडाचे पिल्लू उड्या मारत असताना शॉक लागण्याचा धोका निर्माण झाला होता त्याच्या जिवावर बेतले होते.तर आपले लेकरू संकटात असल्याचे लक्षात येताच मादी माकडाने क्षणाचाही विलंब न लावता पिलाकडे धाव घेत त्याला शेपटीला ओढत मागे घेऊन त्याला सुरक्षित ठिकाणी हलवले.

आपल्या जीवाची आणि कोणत्याही भीतीची पर्वा न करता पिलाच्या मदतीसाठी धावणाऱ्या आईची धाडशी झुंज मोबाईल कॅमेऱ्यात कैद करण्यात आली.काही वेळात हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात वायरल झाला.

# महाराष्ट्रातील ऑलिव्ह रिडले समुद्र कासव संवर्धन कार्यक्रमाला यशस्वी प्रतिसाद

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शासनाच्या वन विभागांतर्गत कांदळवन कक्ष, कांदळवन प्रतिष्ठान आणि स्थानिक कासव मित्र यांच्या संयुक्त सहभागातून राबविण्यात येणाऱ्या ऑलिव्ह रिडले समुद्र कासव संवर्धन कार्यक्रमांतर्गत २०२५-२६ हंगामात राज्यातील ५६ समुद्रकिनाऱ्यांवर एकूण १ हजार ७२४ कासवांच्या घरट्यांची नोंद करण्यात आली. या घरट्यांमधील तब्बल एक लाख आठ हजार ५९६ कासवांच्या पिल्लांना यशस्वीरित्या समुद्रात सोडण्यात आले असून, एकूण उबवण यशाचे प्रमाण ६१.२० टक्के नोंदविण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील किनारी जिल्ह्यांपैकी रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक ९६४ घरटी नोंदविण्यात आली असून, त्यामधून ५४ हजार २२७ पिल्लांना समुद्रात सोडण्यात आले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७३८ घरट्यांमधून ५३ हजार ३२५ पिल्लांना समुद्रात सोडण्यात आले असून ६९.९५ टक्के इतके राज्यातील सर्वाधिक उबवण यशाचे प्रमाण नोंदविण्यात आले. रायगड जिल्ह्यात २२ घरट्यांमधून एक हजार ४४ पिल्लांना समुद्रात सोडण्यात आले.



यंदाच्या हंगामात रायगड जिल्ह्यातील आरावी, रत्नागिरी जिल्ह्यातील वेळणेश्वर, वरवडे, नेवरे, ढोकामळे, पूर्णगड, सालदुरे/पानंदे आणि कचरे तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दाभोळी आणि कोंडुरा या समुद्रकिनाऱ्यांवर प्रथमच कासवांची घरटी नोंदविण्यात आली. यावरून महाराष्ट्राची किनारपट्टी ऑलिव्ह रिडले समुद्र कासवांच्या प्रजननासाठी अजूनही महत्त्वपूर्ण अधिवास असल्याचे अधोरेखित होते.

सन २०१८ पासून कांदळवन कक्ष, कांदळवन प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या सहकार्याने मच्छीमारांसाठी नुकसानभरपाई योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत मासेमारी करताना मच्छीमारांच्या जाळ्यात अडकलेल्या समुद्री कासवांसह इतर संरक्षित समुद्री प्राण्यांना जाळे कापून जीवनदान देणाऱ्या मच्छीमारांना नुकसानभरपाई देण्यात येते. आतापर्यंत महाराष्ट्रात ४८६ समुद्री कासवांना वाचविण्यात मच्छीमार आणि वन विभागाला यश मिळाले असून, त्यासाठी मच्छीमारांना एकूण सुमारे ६१ लाख २१ हजार ८५० रुपयांची नुकसानभरपाई देण्यात आली आहे.

याचप्रमाणे समुद्री कासवे इजा किंवा संसर्गामुळे अनेकदा समुद्रकिनाऱ्यांवर जखमी अवस्थेत आढळतात. अशा कासवांची संख्या पावसाळ्यात अधिक प्रमाणात दिसून येते. जिवंत कासव किनाऱ्यावर वाहून आल्यास त्यांना तातडीने उपचार मिळावेत यासाठी कांदळवन कक्षामार्फत 'मरीन रिस्पॉन्डंट गट' स्थापन करण्यात आला आहे. या गटात महाराष्ट्र वन विभागाचे कर्मचारी (वनपरिक्षेत्र अधिकारी), कांदळवन प्रतिष्ठानचे कर्मचारी, पशुवैद्यकीय डॉक्टर, स्वयंसेवी संस्थांचे सदस्य, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि प्राध्यापक यांचा समावेश आहे.

सन २०११ पासून वाईल्डलाइफ कन्झर्व्हेशन अँड ॲनिमल वेल्फेअर असोसिएशन आणि महाराष्ट्र वन विभाग (डहाणू विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने डहाणू येथे समुद्री कासवांसाठी उपचार व पुनर्वसन केंद्र चालविण्यात येत आहे. तसेच कांदळवन कक्ष, महाराष्ट्र वन विभाग आणि कांदळवन प्रतिष्ठान यांच्या वतीने मुंबई व परिसरातील समुद्रकिनाऱ्यांवर आढळणाऱ्या जखमी कासवांच्या उपचारासाठी ऐरोली येथे कासव उपचार केंद्र उभारण्यात आले आहे. याशिवाय रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतही तात्पुरती उपचार केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

# सुरळीत वीजपुरवठ्यासाठी विजय भोईर यांचे महावितरणला निवेदन

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यात वारंवार वीजपुरवठा खंडित होणे व व्होल्टेजमध्ये सतत चढउतार होत असल्याने नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा मुद्दा माजी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी महावितरण प्रशासनाकडे उपस्थित केला आहे. याबाबत उरणचे आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कार्यकारी अभियंता, महावितरण उरण विभाग यांना निवेदन दिले आहे.

या निवेदनात वारंवार वीजपुरवठा खंडित होण्यामुळे घरगुती विद्युत उपकरणांचे नुकसान होत असल्याने तातडीने दुरुस्ती व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्युत यंत्रणेची तपासणी करून संभाव्य अपघात टाळावेत, तसेच नुकसानग्रस्त ग्राहकांना योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशीही मागणी करण्यात आली.यासंदर्भातील निवेदन ऊर्जा विभागाच्या मंत्र्यांनाही ई-मेलद्वारे पाठविण्यात आले असून उरणकरांना सुरक्षित, व अखंडित वीजपुरवठा मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# कौतुकास्पद! आदर्श पतसंस्था बनली निक्षय मित्र

**अलिबाग : प्रतिनिधी**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने २५ क्षयरुग्णांना अन्नाची टोपली देण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. या रुग्णांना सहा महिने आदर्श पतसंस्था अन्नाची टोपली पुरविणार आहे. आदर्श आता निक्षय मित्र बनली आहे.

आदर्श पतसंस्थेने प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियान अतर्गत सामाजील विविध घटकांकडून क्षयरूग्णांना सहाय्य मिळवून त्यांना निक्षय मित्र बनविण्याची योजना राबली जात आहे. या योजनेतून क्षयरुग्णांना सहा महिने ते तीन वर्षांसाठी कोरडा आहार पुरविण्यात येतो. या



योजनेत सभागी होऊन अदर्श पतसंस्था निक्षय मित्र बनली आहे. 'आदर्श'ने २५ क्षयरूग्णांना सहा महिने अन्नाची टोपली देण्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

आदर्श नागरी सहकारी पत संस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांचा वाढदिवसा निमित्त आदर्श भवन येथ आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात २५ रूग्णांना अन्नाच्या टोपलीचे वाटप करण्यात आले. या २५ रूग्णांना सहा महिने 'आदर्श'तर्फे अन्नची टोपली देण्यात येणार आहे.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ अक्षयराज राठोड, आरोग्य सहाय्यक मंगेश पाटील, वरिष्ठ औषधोपचार पर्यवेक्षक किर्तीकांत पाटील, सतिश दौलतराव, माधुरी पाटील, आदर्श पतसंस्थेचे सर्व संचालक , कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

आदर्श नागरी सहकारी पत संस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांचा वाढदिवसानिमित्त सोमवारी आदर्श भवन येथे आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे शासकीय रक्तपेढीच्या सहकार्याने आदर्श रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्याला रक्तदात्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. ४२ रक्तदात्यांनी या शिबिरात रक्तदान केले.

# पोलादपूर नगरपंचायत आणि महामार्ग विभागाची नालेसफाई पहिल्याच पावसात उघड



**पोलादपूर : प्रतिनिधी**

गेल्या मंगळवारी पाच मिनिटे झालेल्या पावसात महामार्गावर वीतभर पाणी तुंबल्याने महामार्ग विभाग व नगरपंचायत पोलादपूरच्या पावसाळ्यापूर्वीच्या नालेसफाईचा गैरकारभार उघड झाला. या पावसाने काही तासापुरता हवेत गारवा निर्माण केला तरी प्रशासनाचा गैरकारभार उघड केला.

मंगळवारी पोलादपूर शहरात फक्त वीस मिनिट पाऊस पडला. पण या पावसाने महामार्ग विभागाच्या गलथान कारभारासह पोलादपूर नगरपंचायतीची पावसाळ्यापूर्वीची नालेसफाई, गटारातून पाणी जाण्यासाठी चर खोदण्याची कामे झाली नसल्याची स्पष्टता पावसाने उघड केली.

पोलादपूर शहरातील प्रभातनगर पूर्व पश्चिम विभागाला जोडणारा मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग वीतभर पाण्याखाली गेल्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांवर महामार्गावरील साचलेल्या पाण्याचे फवारे उडत होते. महामार्गावर दोन्ही बाजूने वाहनांचे उडणारे पाणी आणि पावसाला सुरुवात झाली असताना महामार्गावरील साचणारे पाणी पाहता नगरपंचायत पोलादपूरचे प्रशासन आणि महामार्ग विभागामार्फत आगामी चार महिने उपाययोजना होतील अथवा कसे याबाबत नागरिक साशंकता व्यक्त करीत आहेत.

# रायगड जिल्ह्यात स्टॉप डायरिया अभियान

## पाच वर्षांखालील बालकांचे सर्वेक्षण

**अलिबाग : प्रतिनिधी**

अतिसारामुळे होणा-या बालमृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी रायगड जिल्ह्यात 'स्टॉप डायरिया' अभियान राबविण्यात येत आहे. मंगळवारी (दि.१६) या अभियानाची सुरुवात करण्यात आली असून ३१ जुलैपर्यंत हे अभियान सुरू राहणार आहे. या अभियानांतर्गत आरोग्य कर्मचारी, आशासेविका घरोघरी जाउन सर्वेक्षण करणार आहेत.



या अभियानामध्ये अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, प्राथमिक शाळा यासोबतच घरोघरी जाउन ० ते ५ वर्ष वयोगटातील बालकांचे सर्वेक्षण आशा, अंगणवाडी सेविका व आरोग्य कर्मचारी करीत आहेत. जर एखादा बालक अतिसारग्रस्त असल्यास त्या बालकाला ओआरएस व झिंक संप्लीमेंटेशन देऊन बालकाचे आरोग्य सुधारण्यात येणार आहे.

स्टॉप डायरीया अभियानामध्ये ओआरएस, झिंकचे वितरण सर्व आरोग्य संस्था व अंगणवाड्यांमार्फत करण्यात येणार असून निव्वळ स्तनपान प्रोत्साहन, रोटा व्हायरस लसीकरण, हाताची स्वच्छता, सुरक्षित पाण्याची व्यवस्था याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच अंगणवाडी, शाळेत सर्व बालक, विद्यार्थी व ग्रामस्थांना हात धुण्याची योग्य पद्धतीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. अतिसार आजाराच्या गंभीर रुग्णांना सेवा देण्यात येणार असून वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी यांचेमार्फत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

जिल्ह्यात अतिसार नियंत्रण मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर,जिल्हाधिकारी किशन जावळे, उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, शल्यचिकित्सक डॉ. पाटील यांनी केले आहे.

# गव्हाणच्या एमएनएम विद्यालयात वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या गव्हाणमधील एमएनएम विद्यालय व टीएनजी कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपण कार्यक्रम मंगळवारी (दि. १६) उत्साहात झाला. कार्यक्रमात शाळेच्या प्राचार्य सायली वडवळकर, पर्यवेक्षक, शिक्षकवृंद तसेच इयत्ता तिसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनात शाळा परिसरात विविध वृक्षांची लागवड केली.

वृक्षारोपणाद्वारे पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून देण्यात आले. विद्यार्थ्यांनी लावलेल्या रोपांचे संवर्धन करण्याचा संकल्पही यावेळी केला.याप्रसंगी प्राचार्या महोदया यांनी विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणीय, सामाजिक आणि आरोग्यदृष्ट्या असलेले महत्त्व पटवून दिले. "वृक्ष हे मानवाचे खरे मित्र असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धन अत्यंत आवश्यक आहे," असे मार्गदर्शन त्यांनी यावेळी केले.

संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. वृक्षारोपणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश यशस्वीरीत्या साध्य झाला.



## दुखवटा

### सीताराम मानकर



**माणगाव :** शहरातील सिद्धिनगर, मोर्बा रोड येथील ज्येष्ठ व्यावसायिक, मनमिळाऊ आणि दिलदार व्यक्तिमत्त्व असलेले सीताराम पांडुरंग मानकर यांचे दीर्घ आजाराने सोमवार दि. १५ जून रोजी दुःखद निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा आणि नातवंडांसह मोठा परिवार आहे.

# तळोजा फेज १मध्ये साकारणार पोलीस स्टेशन

## नगरसेवक, पदाधिकारी, पोलिसांकडून भूखंडाची संयुक्त पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा फेज-१ येथे प्रस्तावित पोलीस स्टेशनसाठी राखीव असलेल्या भूखंडाची मंगळवारी (दि. १६) नगरसेवक, भाजप पदाधिकारी व वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्या उपस्थितीत पाहणी करण्यात आली. वाढत्या लोकसंख्येमुळे कायदा-सुव्यवस्थेवरील ताण लक्षात घेता प्रथम टप्प्यात पोलीस चौकी आणि पुढे पूर्ण सुविधायुक्त स्वतंत्र पोलीस स्टेशन उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून शासन स्तरावर पाठपुरावा केला जाणार आहे.



तळोजा परिसरात काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर नागरी विकास झाला असून लोकसंख्येतही वाढ झाली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे कायदा-सुव्यवस्थेवरील ताण वाढत असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी अधिक सक्षम पोलीस यंत्रणेची गरज निर्माण झाली आहे. महिला सुरक्षा, वाहतूक व्यवस्थापन तसेच वाढत्या गुन्हेगारी घटनांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशनची आवश्यकता नागरिकांकडून सातत्याने व्यक्त केली जात आहे. भाजप आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या या मागणीची गांभीर्याने दखल घेतली असून प्रथम टप्प्यात या ठिकाणी पोलीस चौकी उभारण्याचा आणि पुढील काळात पूर्ण सुविधांनी युक्त स्वतंत्र पोलीस स्टेशन उभारण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी नगरसेवक दिनेश खानावकर, नगरसेवक नितेश पाटील, नगरसेविका विजयश्री पाटील, भाजपचे उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, निर्दोष केणी, नंदू म्हात्रे, नितीन भोईर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# उपजिल्हा रुग्णालय महापालिकेकडे द्या!

## डॉ. अरुणकुमार भगत यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना अधिक दर्जेदार व अद्ययावत आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात यावे, अशी मागणी नगरसेवक डॉ. अरुणकुमार शंकर भगत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे तसेच या संदर्भातील निवेदनाची प्रत भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनाही डॉ. भगत यांनी दिली आहे.

मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात डॉ. भगत यांनी नमूद केले आहे की, सध्या हे उपजिल्हा रुग्णालय जिल्हा आरोग्य विभागाच्या कार्यक्षेत्रात येत असून रुग्णालयात अनेक मूलभूत सुविधांचा अभाव आहे. रुग्णालयात पुरेशा औषधांचा तुटवडा असून डॉक्टरांची संख्याही अपुरी आहे तसेच सफाई कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने स्वच्छतेचे प्रश्न निर्माण होत आहेत. याशिवाय आवश्यक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध नसल्याने गंभीर रुग्णांवर तातडीने उपचार करणे कठीण होत असून काही महत्त्वाच्या शस्त्रक्रियाही करता येत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मोठ्या संख्येने नागरिक या रुग्णालयावर उपचारासाठी अवलंबून असल्याने हे रुग्णालय महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्यास स्थानिक स्तरावर अधिक प्रभावी प्रशासन, अत्याधुनिक सुविधा आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध होऊ शकतील, असा विश्वास डॉ. भगत यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, पनवेल महानगरपालिकेचे स्वतःचे प्रशासकीय व्यवस्थापन असल्याने रुग्णालयाच्या विकासाला गती मिळेल व नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा मिळतील. त्यामुळे जनहिताचा विचार करून तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय तत्काळ पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात यावे, अशी मागणी डॉ. अरुणकुमार भगत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त शुभेच्छा तसेच कौशल्य प्रशिक्षणाबाबत माहिती देण्यासाठी प्रथम एज्युकेशन फाउंडेशन मुंबईचे पुनीत पुजारी, हेल्थकेअर प्रमुख प्रवीण बनसोडे, कोकण विभागप्रमुख सविता येवले आणि रयत शिक्षण संस्था रायगड विभाग पीआरओ बाळासाहेब कारंडे यांनी त्यांची भेट घेतली.**

# सीकेटी विद्यालयात पुष्पवृष्टी अन् औक्षणाने विद्यार्थ्यांचे स्वागत

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल येथे मराठी माध्यमिक विभागात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा प्रवेशोत्सव विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास म्हात्रे व पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला. पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या प्रांगणात एकत्रितरित्या उभे करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी मुख्याध्यापक कैलास म्हात्रे व पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर व सर्व शिक्षकवृंद उत्साहाने सज्ज होते. "या चिमुकल्यांनो शाळेमध्ये या, सीकेटीच्या विद्यार्थ्यांनो शाळेमध्ये या!" या गीताला शाळेतील संगीत शिक्षिका अर्चना पाटील यांनी स्वरबद्ध व तालबद्ध केले. महिला शिक्षकवृंदाने स्वरचित गीताचे उत्तम सादरीकरण केले. सर्व विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन हार्दिक स्वागत केले.



तसेच मुख्याध्यापक कैलास म्हात्रे व पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मांगल्याची सुरुवात व यशासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यार्थ्यांचे औक्षण करून पुष्पवृष्टी करत स्वागत केले.पाचवी ते दहावी वर्गनिहाय व तुकडीनिहाय वर्गशिक्षकांनी विद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची भेटवस्तू दिली. तसेच शासनातर्फे आलेल्या पुस्तकांचे विद्यार्थ्यांमध्ये वाटप केले. या संपूर्ण प्रवेशोत्सवाच्या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक कैलास म्हात्रे व पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर व सर्व शिक्षकवृंद यांनी अथक परिश्रम घेतले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे तसेच संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सर्व सदस्यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## निवडक

### उभ्या केलेल्या दुचाकीची चोरी

**पनवेल :** शहरातील वेलनेस मेडिकल स्टोअरसमोर उभी करून ठेवलेल्या टीव्हीएस ज्युपिटर गाडीची अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना घडली आहे. कृष्णा मल्हारी यांच्या निळ्या रंगाच्या टीव्हीएस ज्युपिटर गाडी क्र.एमएच-०१-डीव्ही-२८८२ची किंमत जवळपास ४० हजार रुपये आहे. ही अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### घरफोडीत लाखोंचे दागिने चोरले

**नवीन पनवेल :** सांगडे येथील घरात प्रवेश करून चोरांनी चार लाख पाच हजार रुपयांचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केली. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १५ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. लक्ष्मण काशिनाथ पाटील हे सांगडे येथे राहत असून त्यांच्या घराचे कुलूप तोडून चोरांनी घरात प्रवेश केला आणि बेडरूममधील लोखंडी कपड्याचे लॉक तोडून दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली.

### दागिने आणि रोख रकमेची चोरी

**नवीन पनवेल :** घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरांनी १९ लाख ६५ हजार रुपये किमतीचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत. यातील फिर्यादी या साई शांती भवन, सेक्टर १९, नवीन पनवेल येथे राहत असून त्यांच्या इमारतीमध्ये राहत असलेल्या त्यांचा भाचा यांच्याकडे रात्री झोपण्यास गेले होते. यावेळी चोरांनी त्यांच्या दरवाजाचे कुलूप तोडले आणि बेडरूममधील १९ लाख ६५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली.

### नोकरीच्या आमिषाने फसवणूक

**नवीन पनवेल :** नोकरी मिळवून देतो असे सांगून एक लाख ७३ लाख ८१ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी आठ जणांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. २८ मे ते जून २०२६पर्यंत एवॉन शिपिंग कंपनी, लँडमार्क बिल्डिंग, सेक्टर ७, खारघर येथे फिर्यादी पंकज सिंग (२३, राहणार कळंबोली) याला शिपिंग कंपनीमध्ये नोकरी लावून देतो, असे सांगून कंपनीतील मालक आणि स्टाफ यांनी पंकज आणि इतर ७५ मुलांकडून एक कोटी ७३ लाख ८१ हजार रुपये स्वीकारले आणि नोकरीला न लावता सर्वांची फसवणूक केली. याप्रकरणी अंजली वर्मा, सत्यम वर्मा, अनुज सिंग, बादल रॉय, विकास रॉय, कशिश, रीना, माधुरी यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ट्रिपल तलाकप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** ट्रिपल तलाकप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात चौघांविरोधात १५ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. नोव्हेंबर २०२५मध्ये सेक्टर १२, खारघर या ठिकाणी फिर्यादी महिलेला पतीने तीन वेळा तलाक तलाक असे म्हणत ट्रिपल तलाक दिला आणि वडिलांकडून सतत पैसे घेऊन येण्यासाठी दबाव टाकून मानसिक त्रास दिला. यावेळी त्यांच्या सासऱ्याने लज्जास्पद वर्तन करून सासूने पीडितेला शिवीगाळ आणि मारहाण केली. याप्रकरणी पीडित महिलेचे पती, सासू-सासरे, मोठे दीर यांच्याविरोधात शारीरिक, मानसिक आणि आर्थिक त्रास दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अमराठी रिक्षाचालकांच्या मराठी शिकवणीवर्गाला प्रारंभ

## १५ ऑगस्टपर्यंत मराठी शिकणे सक्तीचे

**पनवेल : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मराठी भाषास सक्तीची या शासनाच्या नियमानुसार राज्यातील अमराठी भाषिक रिक्षाचालकांना मराठी शिकता यावे यासाठी राज्यभर मराठी शिकवणी वर्गाचे प्रारंभ सुरू झाले आहेत. महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग पनवेल, कोकण मराठी साहित्य परिषद शाखा पनवेल व सुधागड विद्या संकुल कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने कळंबोलीतील सुधागड विद्या संकुलात अमराठी रिक्षाचालकांसाठी मराठी शिकवणी वर्गाच्या प्रारंभाचे उद्घाटन सोमवारी सकाळी करण्यात आले.

यावेळी मोठ्या संख्येने रिक्षाचालक उपस्थित होते. अमराठी रिक्षाचालकांना १५ ऑगस्टपर्यंत मराठी शिकून त्याची परीक्षा देऊन त्याचे प्रमाणपत्र मिळवणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानंतर मात्र परिवहन विभागाकडून सक्तीची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे पनवेल परिवहन विभागातील सहाय्यक परिवहन अधिकारी सुरज पवार यांनी सांगितले आहे. पनवेल परिवहन विभागातील



अमराठी चालकांना मराठी भाषा शिकून त्याचे प्रमाणपत्र मिळवण्याची कार्यशाळा कळंबोलीतील सुधागड विद्या संकुलात सोमवारी सकाळी पार पडली. या शिकवणी वर्गाच्या प्रारंभ साठी पनवेल परिवहन विभागातील सहाय्यक परिवहन अधिकारी सुरज पवार, सौरभ सोनवणे, अनिल पांढरे,कोकण मराठी साहित्य परिषदेचे नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी, पनवेल शाखेचे अध्यक्ष सुभाष कुडके,संजय गोडसे, रिक्षा चालकांना प्रबोधन करण्यासाठी एडवोकेट सुयश प्रधान, नितळ वढावकर विद्या प्रभू,सुधागड विद्या संकुलातील उपप्राचार्य धर्मेंद्र दीक्षित सह मोठ्या संख्येने रिक्षाचालक उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना एडवोकेट सुयश प्रधान यांनी सांगितले की अमराठी भाषिक की ज्यांना मराठी अजिबात येत नाही त्यांच्यासाठी १५ ऑगस्टपर्यंत मराठी भाषा शिकवणीचे वर्ग परिवहन विभागाकडून घेण्यात येणार आहेत.

तब्बल २०० पानांचे शासनाने निर्गमित केलेले पुस्तक असून त्यातील अभ्यास हा रिक्षाचालकांना करायचा आहे. परंतु एवढा अभ्यास करणे शक्य नसल्याने त्यातील फक्त १६ मुद्दे प्रमुख हे शिकवले जाणार असून ते चार भागात चार चार ओळीचे संभाषण हे रिक्षा चालकांना शिकवले जाणार व त्यानंतर त्यांची परीक्षा घेऊन त्यांना डिजिटल पद्धतीचे प्रमाणपत्र ही दिले जाणार आहे.यासाठी चारही वर्गांना संबंधित रिक्षा चालकाने हजर राहणे सक्तीचे आहे. या चार शिकवणी वर्गामध्ये विविध प्रकारची चार चार वाक्य दैनंदिन जीवनात वापरली जाणारे मुद्दे शिकवले जाणार आहे. ती फक्त त्यांनी तोंडी अधिकाऱ्यांना परीक्षेच्या वेळी सांगावयाची आहेत.अत्यंत सोप्या पद्धतीची वाक्य ही मराठी भाषेतील शिकवली जाणार असून त्याचा दैनंदिन जीवनामध्ये रिक्षा चालक व ग्राहकांमध्ये वापर होणार आहे. त्यामुळे होणारे गैरसमज वादविवाद भविष्यात टाळता येणार आहेत. सदरचे प्रशिक्षण हे पूर्णपणे मोफत असून प्रशिक्षणाचा कालावधी १५ ऑगस्टपर्यंतच सीमित आहे. त्यानंतर प्रशिक्षणाला येणाऱ्या रिक्षा चालकांना त्याची शासनाची फी भरणे सक्तीचे होणार आहे.

> **राज्य परिवहन विभागातर्फे अमराठी तसेच परप्रांतीय परमिटधारक रिक्षाचालकांना मराठी येणे बंधनकारक आहे. परिवहन विभाग व कोकण साहित्य मराठी परिषद यांच्या विद्यामाने मराठी शिकवणी मोफत वर्गाचे आयोजन शासनाकडून करण्यात आले. रिक्षाचालकांच्या विविध संघटनांनी शासनाच्या या मराठी शिकवणी वर्गाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. १५ ऑगस्टपर्यंत मराठी भाषा शिकली नाही तर सक्तीने कार्यवाहीचे निर्देश देण्यात आलेत. रिक्षाचालकांनी मराठी भाषा शिकून प्रमाणपत्र अवगत करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.**
> **-सुरज पवार, सहाय्यक परिवहन अधिकारी, पनवेल, रायगड**

# कळंबोलीतील नवीन सुधागड शाळेत पहिल्या दिवशी पुष्पवृष्टी

**कळंबोली : प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त कळंबोली सेक्टर-१ येथील नवीन सुधागड शाळेत विद्यार्थ्यांच्या स्वागताचा उत्साहपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य, आत्मविश्वास आणि आनंद निर्माण व्हावा या उद्देशाने विशेष स्वागत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात शिवसेना पनवेल जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक रामदास शेवाळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरणात व्हावी यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रामदास शेवाळे यांनी मन लावून अभ्यास करण्याचे, शिस्त आणि संस्कार जोपासण्याचे तसेच आई-वडील, शिक्षक आणि शाळेचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन केले. शिक्षणाच्या बळावर उज्ज्वल भविष्य घडवत यशाच्या नव्या शिखरांकडे वाटचाल करण्याचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

यावेळी नगरसेविका सायली सरक, नगरसेवक रवींद्र भगत, प्राचार्य राजेंद्र पालवे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकवर्ग उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साहामुळे संपूर्ण परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले होते. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे अशा उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नव्या वर्षाबद्दल उत्सुकता आणि आत्मविश्वास वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले आहे.

# टीप देण्याच्या कारणावरून एकाला मारहाण

**नवीन पनवेल : वार्ताहर**

वेटरला टीप देण्याच्या कारणावरून बांबूने डोक्यात मारून जखमी केल्याप्रकरणी आरोपी महेंद्र शेट्टी आणि हॉटेलमधील तीन ते चार वेटर यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १६ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रथमेश पवार हा सेक्टर २४, कामोठे येथे राहत असून तो त्याच्या मित्रासोबत दारू पिण्यासाठी वेलवेट हॉटेल, कोळखे येथे गेला होता. यावेळी वेटरला टीप देण्याच्या कारणावरून वेटर आणि त्यांच्यामध्ये वाद झाला. यावेळी महेंद्र शेट्टी आणि हॉटेलमधील तीन ते चार वेटर यांनी प्रथमेश याच्या डोक्यात बांबूने मारले आणि शिवीगाळ केली. यावेळी प्रथमेशच्या गळ्यातील सोन्याची चेन तुटून नुकसान झाले.



**पनवेल : प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत लोकनेते दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील तसेच पनवेल तालुक्यातील खारकोपर गावचे भाजप अध्यक्ष सुधीर ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी न्हावा गावचे माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे, किशोर पाटील, गजानन घरत, चंदन ठाकूर, सुदर्शन घरत, मेघनाथ ठाकूर आदी उपस्थित होते.**




## संपादकीय

# संघर्षाऐवजी संवाद

अमेरिका आणि इराण यांच्यात एका प्राथमिक करारावर सहमती झाली असून युद्ध संपवण्यासाठी, अमेरिकेने इराणभोवती केलेली नाकेबंदी उठवण्यासाठी आणि होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्यासाठी येत्या शुक्रवारी १९ तारखेला स्वित्झर्लंडमध्ये या पहिल्या करारावर उभय देशांकडून स्वाक्षरी होणार आहे. गेल्या शंभरहून अधिक दिवसांपासून सुरू असलेल्या अमेरिका-इराण युद्धाला अखेर पूर्णविराम मिळाल्याने जागतिक स्थैर्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी इराणसोबतच्या शांतता कराराला अंतिम रूप देण्यात आल्याची घोषणा केली. तसेच होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडली जाईल आणि सागरी नाकेबंदी अमेरिकेकडून तातडीने उठवली जाईल असेही त्यांनी आपल्या ट्रुथ सोशल प्लॅटफॉर्मवर लिहिले. या कराराचा मुख्य उद्देश शस्त्रसंधी टिकवून ठेवणे आणि पुढील वाटाघाटींसाठी एक राजनैतिक चौकट निर्माण करणे हा आहे. विशेषतः जगाच्या ऊर्जा सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या होर्मूझ सामुद्रधुनीतील वाहतूक पुन्हा सुरळीत करण्याचा प्रयत्न या करारात दिसून येतो. त्यामुळेच या प्राथमिक करारानंतर कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण झाली. होर्मूझ सामुद्रधुनीतून जागतिक तेलवाहतुकीचा मोठा हिस्सा पार पडत असल्याने तेथील स्थैर्याचा परिणाम संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेवर होतो. संघर्षाऐवजी संवादाला प्राधान्य देण्याची तयारी दोन्ही बाजूंनी दाखवण्यात आली यानेच या घडीला जगातील अनेक देशांना दिलासा मिळाला असून त्यामुळेच कराराच्या घोषणेनंतर तेलबाजारात सकारात्मक प्रतिक्रिया दिसून आली. भविष्यात ऊर्जा पुरवठा अधिक स्थिर होण्याची शक्यता आता व्यक्त केली जात आहे. तेलाच्या किंमतींवरील दबाव कमी झाल्यास त्याचा लाभ भारतासारख्या आयातदार देशांना मिळू शकतो. भारताचे पश्चिम आशियातील अनेक देशांशी आर्थिक, ऊर्जा आणि सामरिक संबंध आहेत. या प्रदेशातील स्थैर्यामुळे ऊर्जा सुरक्षितता वाढेल, व्यापार सुलभ होईल आणि भारतीय नागरिकांच्या हितांचे संरक्षण होईल. त्यामुळे भारताने या प्रक्रियेला पाठिंबा दर्शविणे स्वाभाविक आहे. युद्ध समाप्तीबाबतच्या अमेरिका आणि इराण यांच्यातील करारावर एकमत झाल्याच्या निर्णयाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वागत केले. शांतता करार लागू झाल्यानंतर या भागात पुन्हा शांतता आणि स्थैर्य निर्माण होण्यासाठी मदत होईल तसेच व्यापार आणि वाहतूक देखील सुरळीत होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. अंतिम करार पूर्ण होण्यासाठी उरलेल्या मुद्यांवर देखील एकमत होईल असेही मोदींनी म्हटले. दोन्ही देशांतील अनेक संवेदनशील मुद्दे पुढील वाटाघाटींसाठी राखून ठेवण्यात आले आहेत. अणुकार्यक्रम, क्षेपणास्त्र धोरण, प्रादेशिक सशस्त्र गटांशी असलेले संबंध आणि आर्थिक निर्बंध यांसारखे मूलभूत प्रश्न अद्याप पूर्णपणे निकाली निघालेले नाहीत. त्यामुळे हा करार काही अंतिम तोडगा नसून एका दीर्घ आणि कठीण प्रक्रियेची सुरुवात आहे. दीर्घकाळापासून परस्परांवर संशय घेणाऱ्या राष्ट्रांनी किमान सामायिक हितसंबंधांच्या आधारावर चर्चा पुढे नेण्याची भूमिका स्वीकारली आहे याचेच आता समाधान मानले पाहिजे. त्यामुळे मध्यपूर्वेतील अस्थिरतेला काही प्रमाणात आळा बसण्याची आशा निर्माण झाली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार प्रमुखांनीही या कराराचे स्वागत करत त्याची प्रामाणिक अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले आहे. गेल्या अनेक दशकांपासून राजकीय अविश्वास, आर्थिक निर्बंध, अणुकार्यक्रमावरील वाद आणि प्रादेशिक संघर्ष यांमुळे अमेरिका-इराण संबंध सतत तणावपूर्ण राहिले आहेत. त्यामुळे शांततेच्या दिशेने केलेला हा सामंजस्य करार हा संघर्षावर संवादाच्या राजकारणाचा विजय मानता येईल.**

# हिंदुत्वाचे रक्षणकर्ते महाराणा प्रताप




मेवाडचे राजे क्रांतिसूर्य महाराणा प्रतापसिंह सिसोदिया म्हणजे वीरता, त्याग, धैर्य, बलिदान, चारित्र्य, राष्ट्रभक्ती व देशाभिमान यांचे मूर्तिमंत प्रतीक होत. अशा महापराक्रमी आणि अपराजित राजाचा जन्म बाप्पा रावळ यांच्या राजवंशात १७ जून १५४० (तिथीप्रमाणे) रोजी कुंभलगड येथे झाला आणि जणू हिंदुत्वाचा रक्षणकर्ता क्रांतिसूर्यच भारतभूमीवर उदयास आला. महाराणा प्रताप यांच्या पिताश्रींचे नाव उदयसिंह, तर मातोश्रींचे महाराणी जयवंता कुंवर होते. क्रांतिसूर्य महाराणा प्रतापसिंह यांनी बाप्पा रावळ, राणा खुमानसिंह, समरसिंह, राणासंगा, राणाकुंभा, उदयसिंह यांच्या शौर्याचा वारसा अखेरच्या श्वासापर्यंत जपला. म्हणूनच ते क्रांतिसूर्य म्हणवले गेले. राणा प्रताप यांचा राज्याभिषेक गोगुंदा येथे संपन्न झाला.

मेवाडच्या राजांचे आराध्य दैवत एकलिंग महादेव हे होते. "पारतंत्र्याच्या साखरभातापेक्षा मला माझ्या स्वातंत्र्यातील मिठभाकर, कंदमुळे पसंत आहेत," असे महाराणा प्रताप हे प्रजेला सांगत असत. म्हणूनच ते ठणकावून सांगत, "प्राण गेला तरी बेहत्तर, पण शत्रूपुढे झुकणार नाही!".महाराणा प्रताप यांच्याकडे अकबर बादशहाच्या तुलनेत सैन्यबळ व युद्धसामग्री अत्यल्प असूनही महाराणा प्रताप सन १५७६ ते १५८६ या दशकात मोगल सैन्याशी प्राणपणाने लढले. हळदीघाट आणि खमनौरच्या युद्धात वनवासी धनुष्यधाऱ्यांच्या सहाय्याने अकबर बादशहा व त्याच्या सैन्याला जेरीस आणून त्यांना रणांगणावरून सळो की पळो करून सोडले.शतकानुशतके भारतीयांच्या हृदयात मानाचे स्थान प्राप्त करणाऱ्या महाराणा प्रतापसिंह सिसोदिया यांनी एक शपथ घेतली होती की, "मी बाप्पा रावळ यांचा वंशज.. माझ्या मातृभूमीला शत्रूपासून मुक्त केल्याशिवाय मी महालात राहणार नाही.. सोन्या-चांदीच्या भांड्यात भोजन करणार नाही.. राजमहालाच्या शयनगृहात झोपणार नाही. तर वृक्षांची छाया हाच माझा महाल, गवत हाच माझा बिछाना आणि झाडांची पानेच माझी भोजनाची भांडी राहतील!".युद्धाच्या वेळी शूरवीर महाराणा प्रताप त्यांच्या अंगावर चिलखत तसेच भाला, दोन तलवारी व अन्य युद्धसाहित्य या सर्वांचे वजन २०८ किलो असायचे.

त्यांची उंची साडेसात फूट होती. यावरून त्यांच्या शारीरिक बळाचा अंदाज येतो.



राणा प्रतापांचे हे अवाढव्य रूप पाहून अकबर बादशहाने आपल्या संपूर्ण जीवनात कधीही राणा प्रतापांसमोर युद्ध करण्याचे धाडस दाखवले नाही, हे ऐतिहासिक वास्तव आहे. यावरून हे सिद्ध होते की, अकबर बादशहाच्या मनात राणा प्रतापांबद्दल केवढे मोठे भय होते. या पार्श्वभूमीवरच त्यांना अपराजित राजा म्हटले जाते.महाराणा प्रताप व त्यांच्या कुटुंबियांचे रानावनात वास्तव्य असताना वनवासींनी (आदिवासी समाज) त्यांचे जागोजागी स्वागत करून त्यांच्या राहण्याची-भोजनाची उत्तम व्यवस्था केली. त्यांच्या कुटुंबियांसाठी रात्रंदिवस पहारा देत डोळ्यात तेल घालून शत्रुपक्षापासून रक्षण केले. महत्त्वाची गोष्ट म्हणजे राणा प्रतापांना युद्धाच्या वेळी त्यांनी पावलोपावली मदतीचा हात दिला. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे महाराणा प्रताप यांचा धारदार भाला, राजपूत सैनिकांची तळपती तलवार आणि वनवासी सैनिकांच्या तीरकामठ्यांच्या वर्षावाने मोगल सैनिकांची दाणादाण उडाली. बारा वर्षे चाललेल्या हळदीघाटाच्या युद्धात अकबर बादशहा आणि त्यांच्या मोगल सैनिकांना जेरीस आणले. त्यामुळे त्यांनी माघार घेऊन अखेर ते आपल्या राज्यात परतले. संकटसमयी वनवासींनी राणा प्रताप व त्यांच्या सैन्यदलाला मदतीचा हात दिल्याची इतिहासात नोंद आहे.

यासाठीच मेवाडच्या राजचिन्हावर एका बाजूस राजपूत सैनिक तर दुसऱ्या बाजूला वनवासी सैनिकाची प्रतिमा कोरली आहे. या राजचिन्हावरून दोन्ही समाजांमधील बंधुत्वाचे नाते प्रतिबिंबित होते. म्हणूनच क्रांतिसूर्य महाराणा प्रताप, निष्ठावान चेतक आणि पराक्रमी वनवासी सेना यांना राजपूत समाजातर्फे त्रिवार मानाचा मुजरा! हळदीघाट व अन्य युद्धात संपादन केलेल्या विजयात राणा प्रताप यांच्या चेतक अश्वाचा मोलाचा वाटा राहिला. रणांगणावर संकटसमयी स्वतःचा जीव धोक्यात टाकून आपल्या धन्याचे प्राण वाचविणाऱ्या चेतकची स्वामीनिष्ठा ही अतुलनीय व अवर्णनीय आहे.

म्हणूनच राणा प्रताप हे चेतकला आपल्या गळ्यातील ताईत मानत. स्वतः जखमी अवस्थेत असूनही धन्याचे प्राण वाचविण्यासाठी चेतकने ६० फूट लांबीच्या नाल्यावरून झेप घेतली. वास्तवात चेतकचे हे धैर्याचे प्रतीक आहे. कृतज्ञतेच्या भावनेतून राणा प्रताप यांनी चेतकचे जारोळ येथे स्मृती स्मारक उभारले. चेतकची धन्याबद्दलची अपार निष्ठा, निस्सीम भक्ती आणि असामान्य पराक्रमाची नोंद भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरात कोरली गेली.

**-रणवीरसिंह राजपूत, ठाणे/नंदुरबार**
**निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र शासन**



## बदलते तंत्रज्ञान

# फास्ट चार्जिंगमुळे फोनची बॅटरी खराब होते का?

आजचे स्मार्टफोन ३० मिनिटांत ५० टक्के चार्ज होतात. ६७W, १२०W असे फास्ट चार्जर बाजारात आल्याने फास्ट चार्जिंग बॅटरीसाठी घातक आहे का असा प्रश्न अनेकांना पडतो. आयआयटी मुंबईचे प्रा. अमोल देशमुख सांगतात,



आधुनिक लिथियम-आयन बॅटऱ्या फास्ट चार्जिंगसाठीच डिझाइन केलेल्या असतात. फोन आणि चार्जरमधील BMS म्हणजे बॅटरी मॅनेजमेंट सिस्टम व्होल्टेज, करंट आणि तापमान सतत नियंत्रित करते. फोन ८० टक्के पर्यंत वेगाने चार्ज होतो आणि नंतर स्पीड कमी होतो. त्यामुळे थेट नुकसान होत नाही.मात्र सतत १०० टक्के चार्ज करणे आणि बॅटरी ० टक्के पर्यंत नेणे यामुळे बॅटरीचे आयुष्य कमी होते. लिथियम-आयन बॅटरीला ३०० ते ५०० चार्जिंग सायकल असतात. एक सायकल म्हणजे ० ते १०० टक्के एकदा चार्ज होणे. वारंवार फुल चार्ज केल्यास या सायकल लवकर संपतात. बॅटरीची केमिस्ट्री खराब होऊन बॅकअप कमी होतो. त्यामुळे २० ते ८० टक्के दरम्यान चार्जिंग ठेवणे उत्तम मानले जाते. ॲपल आणि सॅमसंगच्या नव्या फोनमध्ये 'Optimized Charging' पर्याय याचसाठी दिला आहे.रात्रीभर फोन चार्जिंगला लावल्यास नुकसान होत नाही कारण १०० टक्के झाल्यावर चार्जिंग आपोआप थांबते आणि ट्रिकल चार्जिंग सुरू होते. पण फोन उशीखाली, पांघरुणाखाली किंवा गरम जागी ठेवल्यास उष्णता बाहेर पडत नाही आणि बॅटरी फुगू शकते. प्रसंगी स्फोटाचा धोका देखील असतो.नेहमी ओरिजिनल किंवा BIS प्रमाणित चार्जर वापरा. स्वस्त, लोकल चार्जरमुळे ओव्हरहिटिंग आणि व्होल्टेज फ्लक्च्युएशनचा धोका असतो. चार्जिंग करताना फोन अति गरम होत असल्यास त्वरित चार्जिंग थांबवा आणि थंड जागी ठेवा. फोनवर कव्हर असेल तर चार्जिंगच्या वेळी काढावे.गेमिंग, व्हिडिओ कॉल किंवा 4K व्हिडिओ पाहताना चार्जिंग केल्यास प्रोसेसर आणि बॅटरी दोन्हीवर लोड येतो. त्यामुळे फोन अधिक गरम होतो आणि बॅटरीवर ताण येतो. शक्यतो चार्जिंग करताना फोन वापरू नका. महिन्यातून एकदा बॅटरी १०० टक्के चार्ज करून ० पर्यंत वापरावी, यामुळे बॅटरी कॅलिब्रेट होते आणि टक्केवारी अचूक दिसते.पॉवर बँक वापरताना सुद्धा चांगल्या प्रतीचीच वापरा. तापमान ३५ अंशांच्या वर गेल्यास लिथियम बॅटरीची क्षमता लवकर कमी होते. म्हणून उन्हात, कारच्या डॅशबोर्डवर फोन चार्ज करू नका. थोड्या काळजीने बॅटरीचे आयुष्य तीन ते चार वर्षे सहज टिकते.

# टेनिसचा जादूगार लिएंडर पेस

भारतीय टेनिसला जागतिक नकाशावर नेणारा खेळाडू म्हणजे लिएंडर एड्रियन पेस. १७ जून १९७३ रोजी गोव्यात जन्मलेल्या लिएंडरच्या रक्तातच खेळ आहे. त्यांचे वडील वेस पेस हे हॉकीपटू होते आणि १९७२च्या म्युनिक ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक विजेत्या भारतीय संघाचे सदस्य होते. आई जेनिफर पेस या बास्केटबॉलपटू आणि भारतीय संघाच्या कर्णधार होत्या. अशा क्रीडा कुटुंबात लिएंडर घडला.



**निमित्त**

लिएंडरने वयाच्या पाचव्या वर्षीच टेनिस रॅकेट हातात घेतले. कोलकात्यातील ब्रिटानिया अमृतराज टेनिस अकादमीत त्याचे प्रशिक्षण झाले. १९९०मध्ये त्याने विम्बल्डन ज्युनियर स्पर्धा जिंकली आणि जागतिक ज्युनियर क्रमवारीत पहिला क्रमांक पटकावला. याच वर्षी तो ज्युनियर यूएस ओपनचा विजेताही ठरला. १९९६च्या अटलांटा ऑलिम्पिकने लिएंडरला खरी ओळख मिळवून दिली. एकेरीत कांस्यपदक जिंकून त्याने ४४ वर्षांनंतर भारताला टेनिसमधील पहिले ऑलिम्पिक पदक मिळवून दिले. उपांत्यपूर्व फेरीत त्याने अव्वल मानांकित आंद्रे अगासीला हरवले होते. हे पदक भारतीय क्रीडा इतिहासातील मैलाचा दगड ठरले. लिएंडरची खरी ताकद दुहेरी आणि मिश्र दुहेरीत होती. महेश भूपतीसोबतची त्याची जोडी 'इंडियन एक्स्प्रेस' म्हणून प्रसिद्ध झाली. या जोडीने १९९९मध्ये फ्रेंच ओपन आणि विम्बल्डन अशी सलग दोन ग्रँडस्लॅम विजेतेपदे पटकावली. त्याच वर्षी ते जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानावर पोहोचले. दोघांनी मिळून २६ एटीपी विजेतेपदे जिंकली.लिएंडरच्या नावावर एकूण १८ ग्रँडस्लॅम विजेतेपदे आहेत. यात आठ पुरुष दुहेरी आणि १० मिश्र दुहेरी विजेतेपदांचा समावेश आहे. त्याने मार्टिना नवरातिलोव्हा, मार्टिना हिंगीस, कारा ब्लॅक अशा दिग्गज खेळाडूंसोबत मिश्र दुहेरीत करंडक उंचावले. २०१६मध्ये वयाच्या ४२व्या वर्षी त्याने मार्टिना हिंगीससोबत फ्रेंच ओपन मिश्र दुहेरी जिंकून वय हे फक्त आकडा असतो हे दाखवून दिले. डेव्हिस कपमध्ये लिएंडरचा विक्रम अद्वितीय आहे. त्याने सलग ३० वर्षे भारताचे प्रतिनिधित्व केले. डेव्हिस कपमध्ये सर्वाधिक ४५ दुहेरी सामने जिंकण्याचा जागतिक विक्रम त्याच्या नावावर आहे. २०१८मध्ये त्याने इटलीच्या निकोला पिएत्रांजेलीचा ४६ वर्षे जुना विक्रम मोडला.

देशासाठी खेळताना त्याची ऊर्जा वेगळीच असायची.लिएंडरला १९९६-९७मध्ये राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, २००१मध्ये पद्मश्री आणि २०१४मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०२४मध्ये त्याचा आंतरराष्ट्रीय टेनिस हॉल ऑफ फेममध्ये समावेश झाला. हा सन्मान मिळवणारा तो पहिला आशियाई पुरुष खेळाडू ठरला. कोर्टवर चपळ हालचाली, कधीही न हार मानण्याची वृत्ती ही लिएंडरची ओळख होती. १९९० ते २०२० अशी तीन दशके तो व्यावसायिक टेनिस खेळला. सात ऑलिम्पिकमध्ये सहभागी होणारा तो एकमेव भारतीय टेनिसपटू आहे. लिएंडर पेस म्हणजे भारतीय टेनिसचा सुवर्णकाळ आणि पुढच्या पिढीसाठी प्रेरणास्थान आहे.

(साभार इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# महिलांनी कोणते व्यायाम करावेत? जाणून घ्या...

प्रत्येकासाठी व्यायाम करणे खूप महत्त्वाचे आहे, मग तो पुरुष असो किंवा स्त्री. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार वेट ट्रेनिंग, कार्डिओ, हाय इंटेन्सिटी इंटरव्हल ट्रेनिंग, फंक्शन ट्रेनिंग केल्याने शारीरिक स्वास्थ्य तर मजबूत होतेच, पण मानसिक आरोग्यही चांगले राहते. जर आपण महिलांबद्दल बोललो तर त्यांना ताकद प्रशिक्षण घेण्याचा सल्लादेखील दिला जातो. किती दिवस व्यायाम करायचा आणि कोणता व्यायाम करायचा याबाबत अनेकवेळा त्यांच्या मनात संभ्रम असतो. चला तर मग जाणून घेऊया याविषयी तज्ज्ञांचे काय म्हणणे आहे.



तुम्हाला निरोगी व्हायचे आहे, वजन कमी करायचे आहे की वाढवायचे आहे हे सर्वप्रथम तुम्हाला ठरवायचे आहे. तुमच्या व्यायामाचे प्रकार यावरच अवलंबून असतील. अमेरिकन हेल्थ डिपार्टमेंट दर आठवड्याला किमान १५० मिनिटे म्हणजे दोन तास ३० मिनिटे व्यायाम किंवा कोणतीही शारीरिक क्रिया करण्याची शिफारस करते.

तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर आठवड्यातून तीन-चार दिवस व्यायाम करा. हे लवचिकतादेखील प्रदान करते आणि आपण वर्कआउटसाठीदेखील तयार होतो. बऱ्याच प्रकरणांमध्ये वजन कमी करण्यासाठी आपल्याला आहारातही बदल करावे लागतात. वजन कमी करण्यासाठी फक्त जिममध्ये जाऊन वेट ट्रेनिंग करणे गरजेचे नाही, तर शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहणेही महत्त्वाचे आहे. यासाठी तुम्ही फिरू शकता, कोणतेही मैदानी खेळ खेळू शकता; जेणेकरून जास्त कॅलरी कमी होऊ शकतील.

कार्डिओला एरोबिक व्यायाम केल्याने तुमच्या हृदयाची गती वाढते. यामध्ये पोहणे, उच्च तीव्रतेचा व्यायाम, किक बॉक्सिंग इत्यादींचा समावेश आहे. अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या मते, दर आठवड्याला १५० मिनिटांचा मध्यम तीव्रतेचा व्यायाम किंवा ७५ मिनिटांचा उच्च तीव्रतेचा व्यायाम केला पाहिजे. ज्यांना स्नायू बळकट करायचे आहेत आणि स्नायू वाढवायचे आहेत, त्यांनी आठवड्यातून ३० ते ६० मिनिटे तीन सत्रांत व्यायाम करावा.

व्यायामाची वेळ जरी प्रकृतीप्रमाणे आणि ऋतुमानानुसार बदलली जात असली तरी दैनंदिन व्यायाम करणे आवश्यक आहे. ज्यामुळे शरीराबरोबरच मनही तंदुरूस्त राहते. म्हणूनच दररोज व्यायाम करणे आवश्यक आहे.

# रोह्यात भाजपतर्फे विद्यार्थ्यांचे गुलाब फूल देऊन स्वागत



**धाटाव : प्रतिनिधी**

नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी रोहा तालुक्यातील भुनेश्वर येथील राजिप शाळेत सोमवारी (दि. १५) शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या पहिल्याच दिवशी चिमुकल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, नवीन गणवेश आणि खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, पालकांचा उत्साह आणि शिक्षकांची धडपड यामुळे संपूर्ण शाळा परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.

या विशेष उपक्रमात रोहा तालुका भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी तसेच शिक्षण विभागातील अधिकारी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांचे स्वागत करताना भाजपाचे तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी प्रत्येक विद्यार्थ्याशी संवाद साधत त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. "आजचे विद्यार्थी हे उद्याचे शास्त्रज्ञ, अधिकारी, उद्योजक आणि देशाचे नेतृत्व करणारे नागरिक आहेत. त्यामुळे प्रत्येक मुलापर्यंत शिक्षण पोहोचणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे," असे त्यांनी सांगितले.यावेळी बोलताना अमित घाग म्हणाले की, "रोहा तालुक्यातील कोणतेही मूल आर्थिक, सामाजिक किंवा इतर कोणत्याही कारणामुळे शिक्षणापासून वंचित राहू नये. अशा प्रत्येक विद्यार्थ्याच्या पाठीशी भारतीय जनता पक्षाचा परिवार खंबीरपणे उभा राहील. शिक्षण क्षेत्रातील कोणतीही अडचण सोडविण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत.

गटशिक्षणाधिकारी धायगुडे यांनी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शासनाच्या वतीने शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेश उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तालुक्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभाग सातत्याने प्रयत्नशील असून एकही विद्यार्थी शाळेबाहेर राहणार नाही यासाठी सर्व शिक्षकांनी विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

शिक्षण विभागाची माहिती देताना त्यांनी सांगितले की, रोहा तालुक्यात सध्या २११ शाळा कार्यरत असून १८ केंद्रांद्वारे शैक्षणिक कामकाज सुरू आहे. केंद्रप्रमुखांच्या १८ पदांपैकी १५ पदे रिक्त आहेत. तसेच उपशिक्षकांच्या ३३९ पदांपैकी ८८ पदे रिक्त असून पदवीधर शिक्षकांच्या ५३ पदांपैकी ४ पदे रिक्त आहेत. पदोन्नती मुख्याध्यापकांची ३ पदेही रिक्त असल्याची माहिती त्यांनी दिली. या रिक्त पदांमुळे काही अडचणी निर्माण होत असल्या तरी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणात कोणतीही तडजोड होऊ दिली जाणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग, धाटाव विभाग प्रमुख सचिन मोरे, केंद्रप्रमुख नारायण गायकर, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष रिया कासार, तालुका सरचिटणीस दिपक मोरे, परेश चितळकर, वैशाली शिंदे, शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे फुलांनी स्वागत, खाऊ वाटप आणि प्रोत्साहनपर संवाद यामुळे चिमुकल्यांमध्ये शाळेविषयी आत्मीयता निर्माण झाली. नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंद, उत्साह आणि सकारात्मक ऊर्जेने झाल्याने हा प्रवेशोत्सव विद्यार्थ्यांसह पालकांच्या स्मरणात राहणारा ठरला. रोहा तालुक्यात शिक्षणाचा दीप अधिक तेजाने प्रज्वलित करण्याचा निर्धार यानिमित्ताने व्यक्त करण्यात आला.

## कांबे शाळेत विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत

**मोहोपाडा :** रसायनीतील रा.जि.प.शाळा–कांबे येथे शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम अंतर्गत नवागतांना वाजत गाजत शाळेत आणण्यात आले. विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. पहिले पाऊल, खाऊ वाटप, पाठ्यपुस्तके वाटप, गणवेश वाटप झाले.

कार्यक्रमास मनोजकुमार पवार पुरवठा निरीक्षक अधिकारी, खालापूर, चांभार्ली ग्रामपंचायतीचे सरपंच प्रतिप पाटील, ग्रामपंचायत सदस्य मनोहर म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष धर्मेंद्र म्हात्रे, उपाध्यक्ष गोंधळी व इतर सदस्य, पालक उपस्थित होते.



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. मंगल प्यारेलाल परमार, २) श्री. राजेंद्र रघुनाथ परमार, ३) श्री. रणजीत प्रेमचंद ओसवाल, ४) श्री. हेमंत मोतीलाल शाह यांच्या मालकीची खालील वर्णनाची जमिन आमचे अशिलांनी कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. व या व्यवहाराची जाहिर नोटीस देण्याबाबत विद्यमान मालक यांनी दिलेल्या सहमतीने सदरची पेपर नोटीस देण्यात येत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे तुपगाव, तालुका खालापूर, जिल्हा रायगड.**

| मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| ४५२/१ | विटाच्या भिंती, सिमेंटचे पक्के घर | २९६.९२ |
| ४५२/२ | मोकळी जागा | ५१२.७३ |
| ४५३/१ | विटाच्या भिंती, सिमेंटचे पक्के घर | ३७.१६ |
| ४५३/२ | मोकळी जागा | ७६२.५५ |
| वरील वर्णन केलेल्या मिळकती या जाहिर नोटीसीचा विषय आहे. | | |

वर वर्णन केलेल्या मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबेकब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांने दिल्यावरून वरील खरेदीदारांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबध, बोजा, गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटनेस मेहर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तिंना सदर हरकतीबाबत त्या हरकती संबधिच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत आणुन द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकती निर्वेध आहे असे समजुन वरील खरेदीदार सदर व्यवहार पुर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

दिनांक : १६/०६/२०२६

सही/–
अॅड. संदीप हरिश्चंद्र बटवाल
पत्ता–१०३, आशादिप अपार्टमेंट,
अनिल झेरॉक्सच्या वर, वासुदेव बळवंत फडके
नाटयगृहाजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
४१०२०६ मोबा.नं. ९८६९४७९२११

# जेएसएम महाविद्यालयात मरणोत्तर नेत्रदान जनजागृती



**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, जे.एस.एम. महाविद्यालय, अलिबाग आणि जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग–रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात जागतिक दृष्टीदान सप्ताहनिमित्त सोमवारी (दि. १५ ) ज नेत्र तपासणी शिबिर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सोनाली पाटील होत्या. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. पंकज घरत आणि प्रा. अश्विनी आठवले, नेत्र चिकित्सा अधिकारी श्रद्धा कुदळे, प्रियांका गोगटे तसेच नेत्र चिकित्सा समुपदेशक श्री अक्षयकुमार गोरे तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी व एन. एस. एस. स्वयंसेवक उपस्थित होते.जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अॅड. डॉ. गौतमभाई पाटील यांनी सदर नेत्र तपासणी शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या.

नेत्र तपासणी शिबिरात १५ प्राध्यापकांनी नेत्र तपासणी करून घेतली तसेच मरणोत्तर नेत्रदानासाठी संकल्प पत्र भरले. एकूण ४५ विद्यार्थ्यांनी नेत्र तपासणी करून घेतली. नेत्रतपासणीनंतर चिकित्सा अधिकारी श्रद्धा कुदळे यांनी विदयार्थी व प्राध्यापक यांना आवश्यकतेनुसार वैद्यकीय सल्ला व मदत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अश्विनी आठवले यांनी केले.

उपस्थितांचे आभार महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकवाड यांनी मानले.

# एकल महिला धोरणासाठी उद्या जिल्हास्तरीय कार्यशाळा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासन स्वतंत्र "एकल महिला धोरण" तयार करीत असून, या धोरणाला अधिक व्यापक, लोकाभिमुख व परिणामकारक स्वरूप देण्यासाठी जिल्हास्तरीय कार्यशाळा दि. १८ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड–अलिबाग येथील राजस्व सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यशाळेत जिल्ह्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, यांच्याकडून सूचना व अभिप्राय स्वीकारण्यात येणार आहेत.रोजगाराच्या संधी, मालमत्ता हक्क, अपत्यांचे शिक्षण, निवारा, शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील सुधारणा, नव्या योजनांविषयी अपेक्षा, महिलांची सुरक्षितता याबाबत सूचना लिखित स्वरूपात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### तळा नगरपंचायत तळा

मु.पो.ता. तळा, जि. रायगड, पिन कोड ४०२१११

फोन नं. ०२१४०–२६९०२१ Email id-nagarpanchayattala@gmail.com. talanagarpanchayat२०२२@gmail.com

जा.क्र/तनपा/आरोग्य/ २८२/२०२६–२७ दिनांकः–१७/०६/२०२६

**खुली ई–निविदा सुचना सन २०२६–२७**

**आरोग्य विभाग**

तळा नगरपंचायतीमार्फत आरोग्य विभागाकडून खालील कामाच्या ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत तळा नगरपंचायत हद्दीतील घनकचरा संकलन वाहतुक व प्रक्रिया करणे तसेच गटार व रस्ते सफाई करणे. (वार्षिक) |

उपरोक्त कामासंबंधी सविस्तर तपशिल व अटी–शर्ती www.mahatenders.gov.in या वेबसाईट वर दिनांक. १७/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजले पासून ते दिनांक. २९/०६/२०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजे पर्यंत उपलब्ध आहे.

सही/– श्रीमती. माधुरी शैलेश घोलप, नगराध्यक्ष, तळा नगरपंचायत तळा

सही/– श्री. चंद्रकांत महादेव रोडे, उपनगराध्यक्ष, तळा नगरपंचायत तळा

सही/– श्रीमती. मनिषा नागसेन वजाळे, मुख्याधिकारी, तळा नगरपंचायत तळा

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलानी मौजे नेरेपाडा ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**

**मौजे– नेरेपाडा, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सव्र्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| नेरेपाडा | नामा बेंडू रोडपालकर | ५ | ७/अ | ०–२४–३०<br>०–०२–३० | ७.०० |
| | | | | एकूण – ०–२६–६० | |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा–या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयाची नोद घ्यावी.

**ता. १६/०६/२०२६**
**ठिकाण : पनवेल**

सही/–
**अॅड. प्रधान मधूकर पाटील**
**१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**मोबाईल. ९३२४३७५५०२**

### पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

**वैदयकीय आरोग्य विभाग**

**कार्यालय :– देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल–४१०२०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.: ०२२–२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ – २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२– २७४५२३३९
ई–मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईटः www.panvelcorporation.com

EXPRESSION OF INTEREST (EOI)

MHD/EOI–१/२०२६

**फेर स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest)**

विषय : पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातांना सिझेरियन व गंभीर व गुंतागुंतीच्या प्रसुती दरम्यान आवश्यकतेनुसार जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमातंर्गत रक्त पुरवठा करणेकरिता रक्तपेढीकडुन स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) मागविणेबाबत

राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार High Risk गरोदर मातांना जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत पालिका स्तरावरुन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र निहाय क्षेत्रामधील गरोदर मातांना पालिकेमार्फत रक्तपुरवठा उपलब्ध करून द्यावयाचा आहे. रक्तपुरवठा सेवा पुरविण्यास इच्छूक असलेल्या रक्तपेढीनी दोन लिफाफे पध्दतीत (Technical and Commercial) होकारपत्र व दरपत्रक सिलबंद पाकीटात दिनांक २४.०६.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत वैद्यकिय आरोग्य विभाग, पनवेल महानगरपालिका, मुख्यालय, पनवेल येथे स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) सादर करावे.

याबाबतची संपूर्ण माहिती पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www. panvelcorporation.com उपलब्ध आहे.

**जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२६/**
**प्र.क्र.१६४/१७५/२०२६**
**दिनांक :–१६/०६/२०२६**

सही/–
**(प्रसेनजीत कारलेकर)**
**उपायुक्त (वैद्यकीय)**
**पनवेल महानगरपालिका**

# नांदगाव हायस्कूल येथे विद्यार्थ्यांचे केले औक्षण





**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंत नगर नांदगाव येथे आज शाळेचा पहिलाच दिवस असल्याने इयत्ता पाचवीमध्ये नव्याने प्रवेश घेणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्प देऊन व ओवाळणी करून करण्यात आले.

मे महिन्याच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर आजपासून रायगड जिल्ह्यातील सर्व शाळा सुरू झाल्या आहेत. इयत्ता पाचवीमध्ये नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा आपलीच वाटावी व त्यांची उपस्थिती कायमस्वरुपी राहण्यासाठी नांदगाव हायस्कूलने सर्व नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्प देऊन करण्यात आले तसेच शाळेच्या पहिल्याच दिवशी शालेय विद्यार्थी यांना नवीन पाठ्यपुस्तके सुध्दा देण्यात आली. इयत्ता पाचवी,सातवी व आठवीमधील शेकडो विद्यार्थी यांना शासनाकडून सर्व शिक्षा अभियान अंतर्गत प्राप्त पुस्तके वाटप करण्यात आली. शाळेच्या पहिल्याच दिवशी नवीन पाठ्यपुस्तके मिळाल्याने शालेय विद्यार्थी यांचे चेहरे फुलून गेले होते.

यावेळी मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप मुख्याध्यापिका अर्चना खोत व पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका अर्चना खोत यांनी मोफत पाठ्यपुस्तके यांची काळजी घ्यावी. पुस्तकांना आवरण घालून पुस्तक दीर्घ काळ टिकेल असे पहावे, अशा सूचना विद्यार्थ्यांना केल्या.

यावेळी पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर,सागर राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे– कल्हे, ता–पनवेल, जि–रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**– मिळकतीचे वर्णन –**

**मौजेः कल्हे, तालुका– पनवेल, जिल्हा– रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर पॉ. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| कल्हे | १ रमीज सईद मुल्ला रा. पटेल मोहल्ला, जमा मशीद जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | १२७ | ०.२९.३०<br>०.०२.३०<br>०.३१.६०<br>हे.आर.पॉ. | २.७५ |
| | | एकुण | ०.३१.६० | |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : 16/०६/२०२६**

सही/–
**अॅड. सरिता महेंन्द्र साखरे**
पत्ता– बंन्सल असोसिएस, पहिला मजला
प्लॉट नं.३०, सेक्टर १/२, रोड नं.४ नविन पनवेल,
बालाजी मंदिरच्या समोर ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६.

### पाहिजेत

शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल येथे सन २०२६ – २०२७ या शैक्षणिक वर्षासाठी एम.एड (स्वयं सहाय्यित) व बी.एड या अभ्यासक्रमांसाठी अंत्यत तात्पुरत्या स्वरुपात घड्याळी तासिका तत्वावर खालील विषयांकरिता सहाय्यक प्राध्यापक पदावर नियुक्तीसाठी थेट मुलाखत आयोजित केली आहे.

| अ.क्र | अभ्यासक्रम | पदनाम | विषय | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | बी. एड | स. प्राध्यापक | इग्रंजी, इतिहास, कॉमर्स, हिन्दी, मराठी, अर्थशास्त्र, | प्रत्येकी १ | UGC, NCTE, University यांनी निर्धारित केलेल्या नियमानुसार |
| २ | बी. एड | स. प्राध्यापक | ICT | १ | UGC, NCTE, University यांनी निर्धारित केलेल्या नियमानुसार |
| ३ | एम.एड (स्वयं) | स. प्राध्यापक | Sem–I to Sem – IV All Subject as per Workload | ४ | UGC, NCTE, University यांनी निर्धारित केलेल्या नियमानुसार |

इच्छुक उमेदवारांनी संपूर्ण माहितीसह आपला अर्ज आवश्यक स्व स्वाक्षरीत छायाप्रती जोडून महाविद्यालयात दिनांक २६/०६/२०२६ रोजी सकाळी ठीक ११ वाजता स्व–खर्चाने महाविद्यालयात उपस्थित रहावे. सोबत मूळ कागदपत्रे ठेवावीत.

वरील तासिका तत्वावरील नियुक्ती ही शैक्षणिक वर्ष २०२६ – २०२७ या वर्षाकरिता मर्यादित असून त्यांचे मानधन हे घड्याळी तासिकानुसार शासन निर्णयानुसार देय राहील.

सही/–
**(डॉ. रमा भोसले)**
**शासकीय, अध्यापक महाविद्यालय पनवेल**

# अस्मिता पवार होणार पोलादपूरच्या नगराध्यक्ष

**पोलादपूर : प्रतिनिधी**

नगरपंचायत पोलादपूरच्या शेवटच्या सहा महिन्यांच्या नगराध्यक्षांची निवड बिनविरोध होण्यासाठी विरोधी गटाच्या नगरसेविका आशा सचिन गायकवाड यांनी दाखल केलेले नामनिर्देशन पत्र मागे घेतल्याने अस्मिता उमेश पवार यांच्या नगराध्यक्षा होण्याची केवळ औपचारिकता शिल्लक राहिली आहे.

युवासेना कोकण विभागीय कोअर कमिटी सदस्य व जिल्हा परिषद सदस्य विकास गोगावले यांच्या यशस्वी मध्यस्थीने निवडणूक टाळण्यात महायुतीच्या नगरसेवकांनी समन्वय साधला आहे.

नगरपंचायत पोलादपूरच्या दुसऱ्या पंचवार्षिक कालावधीतील शेवटच्या नगराध्यक्ष म्हणून अस्मिता उमेश पवार यांचा शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या विरोधी गटातर्फे गटनेते दिलीप भागवत, स्वप्नील भुवड, श्रावणी शहा, गरुड या नगरसेवकांनी आशा सचिन गायकवाड यांचा उमेदवारी अर्ज मुख्याधिकारी विनय शिपाई यांच्याकडे दाखल केल्याने निवडणूक होण्याची शक्यता निर्माण झाली होती, मात्र बांधकाम सभापती सिध्देश शेठ यांनी विरोधी गटाचे नगरसेवक स्वप्नील भुवड व आशा गायकवाड यांचे पती सचिन गायकवाड वकील यांच्यासोबत मुंबईतील हॉटेल ट्रायडंटमध्ये शिवसेनेचे युवासेना कोकण विभागीय कोअर कमिटी सदस्य व जिल्हा परिषद सदस्य विकास गोगावले यांची चर्चा घडवून आणल्याने आशा गायकवाड यांनी दाखल केलेला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. गुरुवारी निवडणूक होण्याआधीच अस्मिता पवार यांच्या निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.

# नवी मुंबईत १०० विहिरींचे पुनरुज्जीवन

## पिण्याव्यतिरिक्त वापरावर देणार भर



**नवी मुंबई : बातमीदार**

एल-निनोच्या प्रभावामुळे यंदा उशिरा आणि कमी पाऊस पडण्याच्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिकेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मोरबे धरणात केवळ १२.७३ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने शहरातील १०० पारंपरिक विहिरींची स्वच्छता करून त्यातील पाण्याचा धुणीभांडी, स्वच्छता, उद्याने व बांधकामासाठी वापर करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले आहेत. यापूर्वीच १० टक्के पाणीकपात लागू करण्यात आली असून विहिरींच्या पुनरुज्जीवनामुळे पाणीटंचाईवर दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार एल-निनोच्या प्रभावामुळे यावर्षी उशिरा आणि कमी पर्जन्यमान असल्याच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिकेने सावध पावले उचलण्यास यापूर्वीच सुरुवात केलेली आहे. या अनुषंगाने स्वतःच्या मालकीचा प्रतिदिन ४५० द.ल.लि. क्षमतेचा मोरबे धरण प्रकल्प असूनही पुरेसा पाऊस पडत नाही तोपर्यंत उपलब्ध असलेले पाणी पुरविण्याच्या दृष्टीने १० टक्के पाणीकपात केलेली आहे. सध्या मोरबे धरणातील जलसाठ्यात १२.७३ टक्के इतकीच पाणी उपलब्धता असल्याने आणखी काही जलस्त्रोतांची चाचपणी करताना नवी मुंबई शहरातील १०० पारंपरिक उघड्या विहिरी कार्यान्वित करण्याचा महत्त्वाचा निर्णय महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी घेतला आहे.

यादृष्टीने तपासणी करण्याचे निर्देशही पाणीपुरवठा विभागाला देण्यात आलेले आहेत. आयुक्तांनी निर्देशित केलेली पाणीपुरवठा विषयक उपाययोजना ही जलस्रोत व्यवस्थापनाच्या खबरदारीचा एक भाग आहे. महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या आढावा बैठकीदरम्यान पाण्याच्या उपलब्धतेच्या अनुषंगाने चर्चा करताना आयुक्तांनी महानगरपालिका क्षेत्रातील पारंपरिक विहिरींचे तातडीने सर्वेक्षण करण्याचे, त्यांची सखोल स्वच्छता करण्याचे तसेच पावसाच्या पाण्याच्या पुनर्भरणासाठी आवश्यक व्यवस्था करण्याचे निर्देश पाणीपुरवठा विभागास दिले. एल-निनोच्या परिणामामुळे यावर्षी मान्सून आणखी उशिरा येण्याची शक्यता असल्याने आणि पाणीटंचाईची भीती वाढल्याने हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. या विहिरीतील पाण्याचा वापर धुणीभांडी, स्वच्छता आणि उद्याने तसेच बांधकामासाठी करता येऊ शकतो हे लक्षात घेत अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांनी सर्व विभाग कार्यालय क्षेत्रातील पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांना त्यांच्या क्षेत्रातील विहिरींची संपूर्ण स्वच्छता करून त्यांचे पाणी पिण्याशिवाय इतर दुय्यम उपयोगासाठी वापरण्याचे निर्देश दिले आहेत.

उघड्या विहिरी बोअरवेलपेक्षा वेगळ्या असतात. त्यातील गाळ काढून स्वच्छ करणे आवश्यक आहे. गृहनिर्माण संस्था आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने शक्य तेथे विहिरींच्या पाण्याचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने देण्यात आले आहेत.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आस्थापनेवर कर आकारणीचे निर्देश

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतींना नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आस्थापनेवर कर आकारणी करण्याचे निर्देश पंचायत समितीने दिले आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरातील ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या विविध व्यावसायिक मालमत्ता, सेवा सुविधा आणि संबंधित आस्थापनांवर नियमानुसार कर आकारणी करण्याबाबत ग्रामपंचायतींना निर्देश देण्यात आले आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ २५ डिसेंबरपासून सुरू झाले आहे. हे विमानतळ सुमारे एक हजार १६० हेक्टर क्षेत्रात पसरले आहे. ग्रामपंचायतचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने पंचायतीने सर्व आस्थापनांवर कर आकारणी करणे आवश्यक आहे. तरघर, उलवा, पारगाव, ओवळे, वडघर, वाघिवली या ग्रामपंचायत हद्दीत विमानतळ आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ही वाणिज्यिक, औद्योगिक आस्थापना आहे. या आस्थापनेवर ग्रामपंचायतीकडून कर आकारणी करणे क्रमप्राप्त आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आस्थापनेवर नियमानुसार कर आकारणी करावी असे निर्देश पनवेल पंचायत समिती यांच्याकडून ग्रामपंचायत यांना देण्यात आलेले आहेत.

दरम्यान, विमानतळामुळे परिसरातील आर्थिक व्यवहार वाढत चालले असून ग्रामपंचायतींच्या उत्पन्नातही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महसुलात वाढ होऊन नागरी सुविधा आणि विकासकामांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध होणार आहे.

विमानतळाच्या विस्तारासह परिसरातील विकास प्रकल्पांना गती मिळत असल्याने स्थानिक प्रशासन आणि ग्रामपंचायतींची जबाबदारीही वाढली आहे. उरण जेएनपीए प्रशासनाकडून संबंधित ग्रामपंचायती कर वसूल करतात.

# नवी मुंबईकरांसाठी आरोग्यसेवेचा महाबूस्ट; एमआरआय, कॅथलॅब, डायलिसिस सेंटरचे लोकार्पण

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधा गुणवत्तापूर्ण करण्यावर भर दिला जात असून आज लोकार्पण व शुभारंभ होणाऱ्या वैद्यकीय सेवा नागरिकांसाठी अतिशय महत्त्वाच्या असल्याचे सांगत महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी या सेवा नवी मुंबईतील नागरिकांना प्राधान्याने उपलब्ध करून दिल्या जाव्यात असे सूचित केले. आरोग्य सेवा बळकटीकरणांतर्गत विविध आरोग्य सुविधांचे लोकार्पण व कामांचा शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते वाशी सार्वजनिक रुग्णालयात संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, बेलापूर विधानसभा सदस्य आमदार मंदा म्हात्रे, उपमहापौर दशरथ भगत, आयुक्त डॉ. कैलास शिंदे, स्थायी समिती सभापती अशोक पाटील, सभागृह नेते सागर नाईक तसेच आरोग्य समिती सभापती डॉ. जयाजी नाथ व उपसभापती गणेश सकपाळ, ब प्रभाग समिती सभापती रुपाली भगत, क प्रभाग समिती शैला पाटील, इतर नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यात्रसंगी सार्वजनिक रुग्णालय, सेक्टर १०, वाशी येथे एम.आर.आय. सेंटर लोकार्पण, मध्यवर्ती निर्जंतुकीकरण विभाग (सी.एस.एस.डी.) कार्यान्वित करणे, रुग्णालय बेड्स उपलब्धता डॅशबोर्ड कार्यान्वित करणे, वाशी आणि ऐरोली येथे हृदयविकार उपचार केंद्र (कॅथलॅब) कामाचा शुभारंभ, मिल्क



बँक सुविधा लोकार्पण, मॉड्युलर मॉर्च्युरी (शवागृह) कार्यान्वित करणे आदी सुविधांचे लोकर्पण व शुभारंभ प्रत्यक्ष स्वरूपात त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, से.८, सीबीडी बेलापूर येथील डायलिसीस सेंटर लोकार्पण आणि सेक्टर २४, जुईनगर येथील पशुवैद्यकीय रुग्णालय लोकार्पण ऑनलाईन संपन्न झाले.यासोबतच नवी मुंबई महापालिका आणि गणेश नाईक यांच्या स्थानिक विकास आमदार निधीतून उभारण्यात आलेले स्वामी विवेकानंद भवन, से.१४, वाशी येथील डायलिसीस सेंटरचे लोकार्पण आणि महापे येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र लोकार्पण प्रत्यक्ष स्थळी जाऊन मंत्री महोदयांच्या हस्ते संपन्न झाले.

यामधील मिल्क बँक सुरू करण्याबाबतची मागणी व पाठपुरावा आमदार मंदा म्हात्रे यांच्या वतीने करण्यात आला आहे.यावेळी बोलताना महापौर सुजाता पाटील यांनी नागरिकांना पायाभूत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच वैद्यकीय सेवा पुरविताना सेवाभाव व समर्पण भावना महत्त्वाची असल्याचे सांगत महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी त्यादृष्टीने चांगले काम करत असल्याची भावना व्यक्त केली. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची बांधिलकी जपणारे काम करण्यासाठी महानगरपालिका कटीबद्ध असल्याचे सांगत यापुढील काळात आणखी उत्तमोत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाईल असे त्या म्हणाल्या.

नवी मुंबईकर नागरिकांना खाजगी रुग्णालयात बेड्स उपलब्ध करून घेण्यासाठी होणारी अडचण दूर करण्याच्या दृष्टीने विशेष डॅशबोर्ड कार्यान्वित करण्यात आला असून त्याचा उपयोग जास्तीत जास्त नागरिकांना होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी पूर्वी जिवाणू-विषाणूजनक आजारांचे प्रमाण मोठे होते, आता जीवनशैलीवर आधारित आजार वाढले असल्याचे दिसून येत असून त्यादृष्टीने आयुष्मान भारत उपक्रमांतर्गत नागरिकांची सर्वांगीण तपासणी केली जात असल्याची माहिती दिली.

साधारणत: वाढत्या स्थूलपणामुळे आजारांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत असून त्यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका ठोस कार्यक्रम राबवित आहे असे त्यांनी सांगितले. नवी मुंबईतील पशुंची वाढती संख्या लक्षात घेऊन पाळीव प्राण्यांवर उपचार करण्यासाठी पशुवैद्यकीय रुग्णालय कार्यान्वित होत असल्याचेही त्यांनी सांगितले. कॅथलॅबच्या माध्यमातून हृदयाप्रमाणेच मेंदूवरही उपचार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

# कोयनावेळे गावातील नालेसफाईची पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी पनवेल महापालिकेच्या भाजपच्या नगरसेविका लीना म्हात्रे, रोहिंजन ग्रामपंचायतीचे माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे आणि संतोषबुवा पाटील यांनी कोयनावेळे गावातील विविध भागांची पाहणी केली. यावेळी गावातील नालेसफाईच्या कामांचा आढावा घेण्यात आला.

पावसाळ्यात नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणी साचणे, पंपाची आवश्यकता, ड्रेनेज लाईनची स्थिती, चेंबरची दुरुस्ती तसेच सिव्हर लाईन चेंबरची तपासणी करण्यात आली. पाहणीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या ठिकाणी



उपाययोजनेच्या सूचना देण्यात आल्या. पावसाळ्यात पाणी तुंबण्याच्या समस्या उद्‌भवू नयेत आणि नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी आवश्यक ती सर्व कामे वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

# चिमुकल्या पावलांनी गाठली ज्ञानाची वाट; नवी मुंबईतील शाळांमध्ये प्रवेशोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

उन्हाळी सुट्टीनंतर नवी मुंबईतील महापालिका आणि जिल्हा परिषद शाळांचे दरवाजे पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी खुले झाले. नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी शाळांच्या परिसरात उत्साह, आनंद आणि नव्या आशांनी भरलेले वातावरण पाहायला मिळाले. 'शाळा प्रवेशोत्सव २०२६-२७'च्या माध्यमातून नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, गुलाबपुष्प आणि टाळ्यांच्या गजरात प्रेमाने स्वागत करण्यात आले.



सुमारे दोन महिन्यांच्या सुट्टीनंतर शाळेच्या अंगणात पुन्हा एकदा बाळगोपाळांच्या किलबिलाटाने चैतन्य फुलले. नव्या गणवेशातील चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर कुतूहल, आनंद आणि थोडीशी भीतीही दिसून येत होती, मात्र शिक्षकांनी आणि शाळा प्रशासनाने केलेल्या प्रेमळ स्वागतामुळे विद्यार्थ्यांचा संकोच क्षणात दूर झाला. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान देणारे माध्यम नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा, संस्कारांचा आणि उज्वल भवितव्याचा पाया आहे. याच भावनेतून शाळांमध्ये विविध स्वागतपर उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रेरणादायी संदेश आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या कृतींचे आयोजन करण्यात आले होते.

त्यामुळे शाळेचा पहिला दिवस प्रत्येक विद्यार्थ्यासाठी संस्मरणीय ठरला. पालकांच्या डोळ्यांतही आपल्या मुलांच्या उज्वल भविष्याची स्वप्ने झळकत होती. शिक्षणाच्या या नव्या प्रवासात प्रत्येक विद्यार्थी आत्मविश्वासाने पुढे जावा, आपल्या क्षमतांचा विकास करावा आणि भविष्यात समाजाचा जबाबदार नागरिक बनावा, अशी अपेक्षा शिक्षक आणि पालकांनी व्यक्त केली. नवीन वर्ग, नवीन पुस्तके, नवीन मित्र आणि नवीन संधी यांसह विद्यार्थ्यांनी नव्या शैक्षणिक वर्षाला उत्साहाने सुरुवात केली. ज्ञान, संस्काराचा मार्ग दाखवणाऱ्या शाळांमधून पुन्हा एकदा उज्वल भविष्य घडवण्याच्या प्रवासाला प्रारंभ झाला आहे. यावेळी विद्यार्थ्यांना सकारात्मकतेचा संदेश देत नव्या वर्षासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# जेव्हा मुख्यमंत्री लहान विद्यार्थिनींचे 'इंटरव्ह्यूअर' बनतात...

रायगड जिल्हा परिषदेच्या पीएमश्री शाळा वहाळ येथील तो वर्ग एरवीसारखाच होता, पण आजच्या दिवशी तिथे एक वेगळीच ऊर्जा आणि कमालीचा उत्साह ओसंडून वाहत होता. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर अनेक मान्यवर समोर उपस्थित होते.



याच गर्दीत इयत्ता चौथीमध्ये शिकणारी एक लहान, पण कमालीची चुणचुणीत मुलगी उभी होती. तिचे नाव यशश्री मिठू घुले. तिच्या चेहऱ्यावर भीतीचा लवलेशही नव्हता, उलट डोळ्यांत एक वेगळीच चमक होती. आपली शिक्षिका साधना पाटील यांनी दिलेल्या मार्गदर्शनावर आणि स्वतःच्या आत्मविश्वासावर विसंबून, यशश्री थेट मुख्यमंत्र्यांच्या समोर उभी राहिली आणि तिने अत्यंत आत्मविश्वासाने मुख्यमंत्र्यांचे स्वागत करत त्यांच्या मुलाखतीला सुरुवात केली.

एका छोट्याशा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थिनीने मुख्यमंत्र्यांना थेट प्रश्न विचारायला सुरुवात करावी हा अनुभव तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येकासाठी थक्क करणारा होता. यशश्रीने हातातील फाईल उघडून पहिलाच प्रश्न अगदी थेट विचारला, सर, आपले नाव काय? बालसुलभ पण अत्यंत स्पष्ट आवाजात विचारलेल्या या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांच्या चेहऱ्यावर एक छानसे हसू उमटले. त्यांनीही तितक्याच आपुलकीने उत्तर दिले, माझे नाव देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस. त्यानंतर यशश्रीने मुख्यमंत्र्यांच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासाविषयी विचारण्यास सुरुवात केली. तिने विचारले, सर, आपल्या या प्रवासाची सुरुवात कशी झाली? मुख्यमंत्र्यांनी तिच्या डोळ्यात पाहत अगदी सोप्या शब्दांत भूतकाळात डोकावत सांगितले की, या प्रवासाची सुरुवात सामान्य विद्यार्थी चळवळीतून झाली होती.

विद्यार्थी परिषदेत काम करताना, विद्यार्थ्यांचे छोटे-मोठे प्रश्न सोडवता सोडवता ते हळूहळू इथपर्यंत कसे पोहोचले, हे त्यांनी अत्यंत रंजकतेने तिला सांगितले. संवाद पुढे सरकत असताना यशश्रीने आणखी एक प्रगल्भ प्रश्न विचारला, "सर, तुमच्या या सामाजिक कामात कोणती मोठी आव्हाने आली आणि तुम्ही त्यावर कशी मात केली?" यावर मुख्यमंत्र्यांनी तिला अगदी एखाद्या मित्राप्रमाणे समजावून सांगितले. ते म्हणाले, जेव्हा आपण समाजात काहीतरी चांगले बदल घडवू इच्छितो, तेव्हा तिथल्या जुन्या व्यवस्थेला बदलावे लागते. व्यवस्था बदलताना अनेक अडचणी आणि आव्हाने येतात, पण अशा वेळी आपल्यासमोर छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महान आदर्श आहेत. शिवरायांनी स्वराज्य स्थापन करताना स्वतःच्या माणसांशी आणि मुघलांशीही लढा दिला, तर बाबासाहेबांनी आपल्याला संविधानाच्या माध्यमातून मानवी हक्क व समतेची शिकवण दिली. त्यामुळे कितीही संघर्ष करावा लागला, तरी आपण प्रामाणिकपणे चांगले काम करत राहिलो की त्यात नक्कीच यशस्वी होतो.

मुख्यमंत्र्यांचे हे विचार ऐकताना तिथे उपस्थित असलेले शिक्षण विभागाचे अधिकारी आणि पालकांचे चेहरे अभिमानाने भरून आले होते. मुलाखतीचा शेवट तर अधिकच रंजक आणि मजेशीर ठरला. यशश्रीने विचारले, सर, आपल्या संपूर्ण कारकिर्दीतील असा कोणता अनुभव आहे, जो आजपर्यंत तुमच्या लक्षात आहे आणि तुम्हाला प्रेरणा देतो? यावर मुख्यमंत्र्यांनी हसतमुख चेहऱ्याने आणि अत्यंत हजरजबाबीपणे उत्तर दिले, "माझ्या आयुष्यात अनेक मोठे अनुभव आहेत, पण आजच्या घडीला तुझी ही घेतलेली मुलाखत माझ्या नेहमी लक्षात राहील आणि मला प्रेरणा देत राहील!"मुख्यमंत्र्यांच्या या उत्तराने संपूर्ण वर्गात एकच हशा पिकला आणि सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. शेवटी यशश्रीने मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या मौल्यवान वेळेबद्दल त्यांचे मनापासून आभार मानले आणि मुख्यमंत्र्यांनीही तिच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली अन् तेही वहाळ शाळेच्या या चिमुरड्या 'यशश्री'चे फॅन झाले! एका शिक्षिकेने घेतलेले परिश्रम आणि जिल्हा परिषद शाळेतील मुलीची ही प्रगल्भ पातळी पाहून, तिथली 'डिजिटल लॅब' आणि 'प्रवेशोत्सव' खऱ्या अर्थाने सार्थ ठरल्याची जाणीव प्रत्येकाला झाली.

**-मनोज सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**ठाणे-रायगड**

# उरणमध्ये जिल्हास्तरीय अग्निशमन प्रशिक्षण पूर्ण

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

महाराष्ट्र शासन, नागरी संरक्षण दल उरण यांच्यामार्फत जिल्हास्तरीय अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला असून रायगडचे जिल्हाधिकारी आणि उपनियंत्रक यांच्या प्रमाणपत्रावर सह्या होऊन सोमवारी (दि. १५) उपनियंत्रक कार्यालय बोरी उरण या ठिकाणी प्रमाणपत्र वितरण सोहळा संपन्न झाला.

प्रशिक्षणाद्वारे अग्निसुरक्षा, आग विझविण्याची तंत्रे, बचावकार्य, आपत्कालीन परिस्थिती व्यवस्थापन, हायड्रंट ड्रिल, टेलर पंप ड्रिल, शिडी कवायत, दोऱ्या आणि गाठींचे प्रकार, आपत्कालीन विमोचन पद्धती तसेच प्रथमोपचार याबाबत सखोल ज्ञान व कौशल्य प्राप्त झाले. एकदिवसीय द्रोणागिरी सिडको अग्निशमन कार्यालयात भेट देऊन सविस्तर प्रात्यक्षिक माहिती घेण्यात आली.

या प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान समाजसेवा व आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात अधिक प्रभावीपणे कार्य करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल.

प्रमाणपत्र वितरणासाठी सहाय्यक उपनियंत्रक शशिकांत शिरसाठ, कार्यालयीन कर्मचारी रूमाजी डुमणा, विभागीय क्षेत्ररक्षक हरेश्वर ठाकूर, चालक नामदेव म्हात्रे मानसेवी निर्देशक यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

या पाठ्यक्रमामध्ये प्रथम क्रमांक मानसी वर्तक या विद्यार्थिनीने पटकाविला. द्वितीय क्रमांक शुभम वीर, समीक्षा ठाकूर तसेच तृतीय क्रमांक वैष्णवी वर्तक, मानसी ठाकूर, मनाली पाटील, अनुष्का किल्लेकर यांना मिळाला.



# रोह्यात खतांचा काळाबाजार

## साठा केला गायब; कृषी सेवा केंद्र मालकावर गुन्हा दाखल

**रोहा : रामप्रहर वृत्त**

रोहा शहरातील शेतकरी कृषी सेवा केंद्र या दुकानातून शासकीय अनुदानावर आलेला लाखो रुपयांचा खतसाठा गायब करून त्याची अनधिकृतपणे विल्हेवाट लावल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.



रोहा तालुका कृषी अधिकारी योगेश सुरडकर (वय ३५ वर्ष) आणि त्यांच्या पथकाने ११ जून रोजी संध्याकाळी या केंद्रावर अचानक छापा टाकला. खताच्या पोस (POS) मशीनमधील नोंदी आणि गोदामातील साठा यांची प्रत्यक्ष तपासणी केली असता, हा संपूर्ण साठा (एकूण किंमत ३,५४,५१३ रुपये) जागेवर उपलब्ध नसल्याचे आणि तो गायब असल्याचे निदर्शनास आले.

खत नियंत्रण आदेश १९८५ आणि जीवनावश्यक वस्तू कायद्याचे उल्लंघन करून ३,५४,५१३ रुपये किमतीचा खतसाठा काळ्या बाजारात विकल्याप्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.४९० बॅग युरिया आणि १२० बॅग सुफला गायबशासकीय दस्तऐवजानुसार, 'श्री समर्थ खत एजन्सी, वडखळ' (ता. पेण, जि. रायगड) यांच्याकडून रोहा येथील 'शेतकरी कृषी सेवा केंद्र' (मालकः नितेश शाम सुतार) या दुकानाला खालील खतसाठा प्राप्त झाला होताःनिम कोटेड युरियाः ४९० बॅग (प्रत्येकी ४५ किलो वजनाची) एकूण किंमत रु. १,२२,५३९/–सुफला (१५ः१५ः१५): १२० बॅग (प्रत्येकी ५० किलो वजनाची) एकूण किंमत रु. २,३१,९७४/–

तपासणीत अभिलेख आणि बिल उपलब्ध नसणे, तपासणीदरम्यान दुकानात खरेदी चलने, खतसाठा नोंदवही, खत विक्री रजिस्टर आणि पीओएस (POS) मशीनमधील नोंदींचे कोणतेही दस्तऐवज आढळून आले नाहीत. शेतकऱ्यांची उघड फसवणूक करुन हा साठा अधिकृतपणे शेतकऱ्यांना न विकता औद्योगिक कारणांसाठी किंवा अनधिकृतपणे काळ्या बाजारात चढ्या दराने विकल्याचा तीव्र संशय व्यक्त केला जात आहे.

कृषी विभागाचे शेतकऱ्यांना जाहीर आवाहन केले आहे. शेतकऱ्यांनी पावतीशिवाय खते खरेदी करू नयेत. तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी खत खरेदी करताना 'पोस' (POS) मशीनची मूळ पावती आणि अधिकृत बिल घेण्याचा आग्रह धरावा. छापील दरापेक्षा जास्त किमतीने खत विक्री होत असल्यास त्याची तत्काळ तक्रार करावी. रासायनिक खतांचा बेकायदेशीर साठा, लिंकेज (खतासोबत इतर औषधे किंवा वस्तू घेण्याची सक्ती) किंवा काळाबाजार होत असल्याचे आढळल्यास तात्काळ तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव संपूर्णपणे गुप्त ठेवले जाईल. नियमबाह्य काम करणाऱ्या विक्रेत्यांना कडक इशारासर्व परवानाधारक खत विक्रेत्यांनी साठा फलक आणि किंमत फलक दुकानात स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी लावणे बंधनकारक आहे.

# शिरगाव शाळेतील विद्यार्थ्यांची पहिल्या दिवशी रथामधून मिरवणूक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील शिरगाव राजिप शाळेच्या पहिला दिवस मोठया आगळीकतेने मुख्याध्यापक राजेंद्र नाईक यांच्या संकल्पनेतून साजरा करण्यात आला. शिवाय मुरूड तालुका पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ आदी मान्यवरांची उपस्थितीसुध्दा लक्ष्यवेधी होती. यानिमित्त विदयार्थ्यासाठी भलामोठा रथातून विदयार्थ्यांना शिरगाव गावातून फिरविण्यात आले. यावेळी विदयार्थ्यांच्या पालकवर्गानेसुध्दा मोठा प्रतिसाद दिला.



शिरगाव राजिप शाळेत १५ जुन हा विदयार्थ्यासाठी अनोखा ठरला. पहिल्याच दिवशी विदयार्थीवर्गाचे स्वागतासाठी मुरूड तालुका पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ, शिवसेना उपतालुका प्रमुख भगिरथ पाटील, माजी सभापती चंद्रकांत मोहिते, राजा चवरकर, वळके केंद्र प्रमुख महेश कवळे, शाखा व्यवस्थापन अध्यक्ष नंदु चवरकर, हिराजी ठाकूर, ग्रामस्थ व महिला मंडळ शिरगाव तसेच मोठया संख्येने पालकवर्ग यांची उपस्थिती होती. या स्वागत समारंभाचे संपुर्ण नियोजन शिरगाव राजिप शाळा मुख्याध्यापक राजेंद्र मधुकर नाईक व सहशिक्षीका प्रियंका सुरेश पाटील यांनी केले.

शिरगाव राजिप शाळेत पहिल्या दिवशी विदयार्थ्याच्या स्वागतासाठी मुख्याध्यापक व सहशिक्षक यांनी जय्यत तयारी केली होती, राजिप शाळेत सुशोभिकरण करण्यात आले होते, तसेच रांगोळी व फुगे यांची आरास पहाण्यासारखी होती, जेणेकरून पहिल्याच दिवशी विदयार्थ्यांना शाळेची आवड होईल.

शाळेच्या पहिल्या दिवशी पालकवर्गासह विदयार्थी सकाळी दहा वाजता शाळेच्या प्रांगणात पोहचले, त्याचे स्वागत मुख्याध्यापक राजेंद्र नाईक,सहशिक्षकी प्रियंका पाटील यांच्यासह मुरूड तालुका पंचायत समिती सभापती व मान्यवर मंडळी यांनी केले. त्यानंतर धसाडे यांचे मालकीचे रथातून विदयार्थ्यासह सभापती निलेश घाटवल व सोबतीला विदयार्थ्याचे पालकवर्ग यांनी भव्य मिरवणूक शिरगाव गावातून काढण्यात आली. यावेळी ग्रामस्थ व महिलांनी मोठया उत्साहानी या रथातील विदयार्थ्यांचे स्वागत केले.

रथ मिरवणूकीतनंतर शाळेच्या सभागृहात प्रमख अतिथी व पालववर्ग यांचे उपस्थितीत विदयार्थ्यासाठी स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, उपस्थित विदयार्थ्याचे स्वागत सभापती निलेश घाटवळ व उपस्थित मान्यवर मंडळी यांनी पुष्पगूच्छ प्रदान करून केले. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र नाईक व सहशिक्षीका प्रियंका पाटील यांच्या वतीने विदयार्थ्यांना मान्यवर उपस्थितांचे हस्ते शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राजेंद्र नाईक यांनी केले.तसेच या कार्यक्रमास मुरूड गटशिक्षण अधिकारी सुनिल गवळी यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रसंगी केंद्र प्रमुख महेश कवळे, शिवसेना उपतालुका प्रमुख भगिरथ पाटील, माजी सभापती चंद्रकांत मोहिते यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर विदयार्थ्यांना शाळेची आवड व ओळख निर्माण व्हावी, यासाठी मुख्याध्यापक राजेंद्र नाईक व सहशिक्षीका प्रियंता पाटील यांनी केलेल्या नियोजनाचे कौतूक सभापती निलेश घाटवळ यांनी केले. यावेळी त्यांनी विदयार्थ्यांनी खुप अभ्यास करावा तसेच चांगले करिअर व भविष्य घडवावे, असे आवाहन केले.

# सोमवती अमावस्येनिमित्ताने संत बाळूमामा मंदिरात भाविकांची मोठी गर्दी

**चौक : प्रतिनिधी**

सोमवती अमावस्या निमित्ताने श्री संत बाळूमामा यांच्या दर्शनासाठी राज्यातील हजारो भाविकांनी गर्दी केली होती.लोणावळा पांगोळी (धनगरवस्ती) येथे असलेल्या संत बाळूमामा मंदिरात सोमवती अमावस्या असल्याने सकाळ पासून भाविक भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून मामांचे दर्शन घेतले, सकाळपासून या मंदिरात हजारो भाविक भक्तांनी उपस्थित राहून घेतले मामांचे दर्शन घेतले.

पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी लोणावळा पांगोळी (धनगरवस्ती) येथे श्रीसंत बाळू मामा देवाचे भव्य मंदिर आहे. या श्री संत बाळूमामा मंदिरात दररोज मोठ्या संख्येने भाविक भक्त येत असतात,तर दर अमावश्येला या मंदिरात मोठ्या प्रमाणात भंडाऱ्याचा महाप्रसाद असतो, त्यातच आज सोमवती अमावश्या असल्याने या मंदिरात सकाळ पासून महाराष्ट्रातून हजारो भाविक भक्तांनी उपस्थित राहून मामांचे दर्शन घेतले, लोणावळा पांगोळी (धनगरवस्ती) येथे गेल्या बारा वर्षांपासून येथे भव्य मंदिर असून येथे मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात, दिवसेंदिवस या मंदिरात हजारो भाविक भक्त येत असून मामांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतात, या सर्व येणाऱ्या भाविक भक्तांची महाप्रसादाची यथोचित सोय श्रीसंत बाळू मामा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी बबन खरात यांच्यासह ग्रामस्थांनी केली होती.

# सारसन प्राथमिक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

**चौक : प्रतिनिधी**

सोमवार १५ जून रोजी प्राथमिक शाळांचा पहिला दिवस सारसन शाळेत नवागत विद्यार्थी यांचे स्वागत नायब तहसीलदार मिलिंद तीरकर यांनी औक्षण, पुष्पगुच्छ देऊन केलं. शाळेतील शिक्षक, शाळा समिती, सरपंच यांनी मोठ्या उत्साहाने उपस्थित होते.नवागत विद्यार्थ्यांचा शाळेतील प्रवेश (प्रवेशोत्सव) हा प्रत्येक मुलासाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे.विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करून त्यांच्यात शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी राज्यभरात शाळांमधून 'प्रवेशोत्सव' आयोजित केला जातो. बालकाचे मानसिक व शैक्षणिक पूर्व तयारी सकारात्मक होण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

पहिल्याच दिवशी मुलांचे शाळेत औक्षण करून, फुगे किंवा चॉकलेट देऊन स्वागत केले जाते, जेणेकरून त्यांची शाळेची सुरुवात आनंददायी होईल. विद्यार्थ्यांमध्ये शाळेची गोडी निर्माण होते. प्राथमिक शाळा सारसन येथे नायब तहसीलदार मिलिंद तीरकर यांनी त्यांचे स्वगत करुन शुभेच्छा दिल्या.

# जागतिक मगर दिन

दरवर्षी १७ जून रोजी जगामध्ये सर्वत्र जागतिक मगर दिन साजरा करण्यात येतो. नदी नाले तलाव समुद्र खाजण अशा अनेक बहुआयामी परिस्थितीतून डायनोसॉर च्या युगापासून उभयचरांमधील आत्ताच्या काळापर्यंत जगत असलेली अस्तित्व टिकवून असलेली ही प्रजात.



महाड मधील सावित्री नदी, गांधारी नदी, काळ आणि या नद्यांच्या विस्तीर्ण प्रवाहापर्यंत मगरींचे अस्तित्व टिकून आहे. साधारण १९८७ ते ८९ या सालामध्ये महाड मधील कवे आळी येथे आपल्या राहत्या घरी प्राध्यापक कुरियन जॉब यांनी मगर पाळल्याचे सर्व महाडकरांनी बघितले आहे. त्यांच्या घरी त्यांनी एक छोटी टाकी करून त्यामध्ये मगरीचे पिल्लू आणले . जे त्यांच्या अगदी घराला लागून असलेल्या नाल्यामध्ये त्यांना आढळून आले. आणि त्यानंतर त्यांनी ते जवळपास तीन वर्ष पाळले होते. नंतर त्यांनी ती मगर सावित्री नदीमध्ये सुरक्षित सोडून दिल.

सावित्री नदीतील महाड मधील नोंदणीकृत माहिती ही यावरून १९८७ पासून आपल्याला प्रत्यक्ष बघायला मिळते. यानंतर जेव्हा मगरींची संख्या कमी होऊ लागली जगामध्ये त्यांना क्रिटिकली इनडेंजर म्हणजेच अति धोक्यात आलेली संकटग्रस्त प्रजात म्हणून वन्यजीव कायद्यान्वये अतिसंरक्षणाचा दर्जा अधिनियम शेड्युल एक मध्ये समाविष्ट केले गेले तेव्हा मगर संवर्धनाची चळवळ सुरू झाली. मगर या प्राण्याबद्दल सविस्तर माहिती आणि वैज्ञानिक अभ्यास करण्यासाठी रोम्युलस विटेकर या शास्त्रज्ञाने भारतामध्ये दक्षिणेकडील भागात प्रथम याचे प्रजनन केंद्र आणि संवर्धन केंद्र सुरू केले. त्याला आता ५० वर्षे लोटली .

या यशस्वी वाटचालीमध्ये त्यांनी काही मगरींच्या पिलांना वेगवेगळ्या कोकणातील नद्या भारतातील नद्या यामध्ये बीज स्वरूपात सोडले आणि या मगरींचे वास्तव्य तसेच त्यांची संख्या थोडी अधिक वाढीस लागली. महाडमध्ये २००२ साली नवे नगर येथे एका बांधकामासाठी काढलेल्या खड्ड्यामध्ये मगर रेस्क्यू करण्यात आली .त्यानंतर मगरीची पिल्ले, दोन फुटी मगर, तीन फुटी मगर तसेच अगदी आठ ते दहा फुटापर्यंतच्या मगरींचे रेस्क्यू गेल्या दोन दशकावून अधिक काळात सिस्केप महाड संस्थेतर्फे करण्यात आले.

आज मितीस मानवी वस्तीत तसेच शेतामध्ये आणि गाव परिसरामध्ये सापडणाऱ्या आणि बचाव कार्यात रेस्क्यू केलेल्या १२० हून जास्त मगरींची नोंद दिसून येते. महाड परिसरात तसेच चिपळूण मध्ये मगरींचे प्रजनन आणि त्यांना योग्य ते वातावरण मिळाल्यामुळे त्यांच्या संख्येत बऱ्यापैकी वाढ झाली .तरी देखील नदी प्रदूषण उत्खनन प्लास्टिक आणि घनकचरा प्रदूषण या व अशा अनेक कारणांमुळे मगरींचे प्रमाण सतत कमी अधिक होत असते. आजही वातावरणात बरोबर मिळते जुळते घेऊन जगण्याकरिता मगरी आणि इतर जलीय प्राणी वनस्पती प्रयत्न करीत आहेत.

वातावरणीय बदलाचा मगरींवर होणारा परिणाम तसेच जैविकतेमध्ये त्यांचे असलेले महत्त्व त्यांची ब्रीडिंग बायोलॉजी या सगळ्याचा अभ्यास करण्यासाठी भवन्स कॉलेज मुंबई येथील प्राध्यापक डॉक्टर उत्कर्षा चव्हाण गेली १४ वर्षे आपल्या एम एस सी च्या विद्यार्थ्यांना इथे आणून नियमित संशोधन करीत आहेत. त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी विविध प्रबंध यावर सादर केले आहे.

यंदाच्या म्हणजेच २०२६ सालच्या मगर दिनाची अधिकृत संकल्पना ही (Theme) प्रत्येक जैविक अंतरा गणिक एक वारसा ही आहे. या दिवसाचा उद्देश मगरींच्या संवर्धनाबाबत जागतिक पातळीवर जागरूकता निर्माण करणे हा आहे.मगरींचे संवर्धन आणि त्यांच्या अधिवासाचे रक्षण करणे हाच या थीमचा मुख्य संदेश आहे. प्रिवी आणि प्रिजिव्ह स्पेशालिटी लिमिटेड. महाड आणि सिस्केप संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महाडमधील मगरींसाठी संवर्धनात्मक प्रकल्पाची उभारणी करण्याचे निश्चित केले गेले.

यामध्ये मगरींचे सर्वेक्षण करणे, मगरींची संख्या निश्चित करणे, मगरींच्या प्रजननाच्या जागा तसेच निवासाच्या जागा निश्चित करून त्यांचे संवर्धन करणे. मानवी हस्तक्षेप टाळण्याकरिता अशा ठराविक जागांचा संरक्षणात्मक जाळी लावून संवर्धनात्मक उपाययोजना करणे. शाळा कॉलेजेस तसेच सामाजिक संस्था पातळीवर मगरी विषयी जनजागृती करणे. गावागावांतून मगरी विषयीचे गैरसमज दूर करून त्यांना सुरक्षित पकडण्याचे प्रात्यक्षिक ट्रेनिंग देणे, तसेच रोहा वनविभाग आणि संबंधित वनपरिक्षेत्र कार्यालय यांच्याबरोबर संशोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करणे. मगरींचे ज्या गावांमधून जास्त प्रमाणात निदर्शनास आले आहे अशा गावांना वन्यजीव पर्यटनाचा दर्जा देणे इत्यादी आणि उपक्रम सुरू करण्यात आले. भारतातील मगरींच्या प्रमुख प्रजातीःमगर / मार्श क्रोकोडाईल प्रामुख्याने गोड्या पाण्यात आढळतात.खारे पाणी असलेली मगर ही जगातील सर्वात मोठी सरपटणारी प्रजाती आहे.घडियाल अतिशय दुर्मीळ आणि धोक्यात आलेल्या प्रजातींमध्ये यांचा समावेश होतो वरीलपैकी महाडमध्ये मार्श क्रोकोडाईल ही प्रजात आढळून येते त्याच्या संवर्धन होणे हे काळाची गरज आहे. मगर हा नदी परिसंस्थेतील वाघा इतकाच महत्त्वाचा प्राणी आहे. बदलत्या तापमानानुसार त्यांच्या शरीराचे तापमान बदलत असते .

त्यामुळे सध्या पावसाअभावी आणि कडक उन्हामुळे तापमानात प्रचंड वाढ झाल्याचे सर्वजण अनुभवता आहेत .याचा परिणाम मगरीवर देखील झाला आहे .कोरड्या नद्या, धरणे तसेच नदी उत्खनन या सर्वांचा परिणाम मगरींच्या स्थलांतरावर दिसून येतो. तापमान वाढीचा परिणाम जर मगरींना समतोलित राखता आला नाही तर त्यांचा मृत्यू होतो.त्यामुळे रोहा वनविभाग तसेच सिस्केप संस्था अशा निदर्शनात येणाऱ्या मगरी पकडून नदीमध्ये सुरक्षित त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यासाठी प्रयत्नशील आहेत. मगर नदी स्वच्छ ठेवण्याचे काम करते तसेच अनेक जलचर यांच्या संख्या वर नियंत्रण करण्याचे काम देखील मगरीद्वारे केले जाते . जसे जंगलामध्ये वाघाचे महत्त्व आहे तसेच पाण्यामध्ये मगरीचे महत्त्व आहे हे आपण सगळ्यांनी जाणून घेणे या निमित्ताने महत्त्वाचे आहे.

**–सागर मेस्त्री, अध्यक्ष,**
**सिस्केप संस्था, महाड**

# रायगडच्या दुर्गम आदिवासी पाड्यावर सारथी फाउंडेशनकडून शाळेचा कायापालट



**पाली : प्रतिनिधी**

रायगड किल्ल्याच्या कुशीत वसलेल्या निजामपूर परिसरातील अतिदुर्गम आदिवासी पाड्यावर सारथी फाउंडेशनने आणखी एका शाळेचा जीर्णोद्धार पूर्ण करून ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे नवे दालन खुले केले आहे. दानशूर सामाजिक कार्यकर्ते शहाजीराव सवदे व सौ. रेखा सवदे यांच्या आर्थिक योगदानातून साकारलेल्या या शाळेचे उद्घाटन १३ जून रोजी माजी राज्यमंत्री व माजी आमदार रमेश शेंडगे यांच्या हस्ते करण्यात आले.

निजामपूर परिसरातील धरणग्रस्त आदिवासी वस्तीवर गेल्या अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधा आणि शैक्षणिक साधनांचा अभाव होता. १९५६ मध्ये उभारलेली शाळा कालांतराने पूर्णपणे जीर्ण झाली होती. मोडकळीस आलेल्या इमारतीत विद्यार्थ्यांना दाटीवाटीने शिक्षण घ्यावे लागत होते. पावसाळा आणि वादळी वाऱ्यांमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला होता.

ही परिस्थिती लक्षात घेऊन गेली चार दशके दुर्गम भागात सामाजिक कार्य करणारे सारथी फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक जंगले यांनी शाळेच्या पुनर्बांधणीचा पुढाकार घेतला. त्यांच्या नेतृत्वाखाली फाउंडेशनने स्थानिक लोकसहभाग आणि दानशूर व्यक्तींच्या मदतीने शाळेचा संपूर्ण जीर्णोद्धार केला. नव्या इमारतीत प्रशस्त वर्गखोली, वीज जोडणी, पंखे, ट्यूबलाईट आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

विशेष म्हणजे, शहाजीराव सवदे यांनी आपल्या मातोश्री कै. हिराबाई सवदे आणि वडील कै. अन्नाप्पा चंदू सवदे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या शाळेसाठी आर्थिक सहाय्य केले. वयाच्या ऐंशीव्या वर्षी वडिलांच्या ४४ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांनी केलेले हे योगदान उपस्थितांसाठी भावनिक आणि प्रेरणादायी ठरले.

# रोटरी दिशा ट्रस्टकडून तीन शाळांसाठी कूपनलिका

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या झुगरेवाडी शाळा तसेच तालुक्यातील अन्य दोन शाळांसाठी डोंबिवली येथील रोटरी दिशा ट्रस्ट यांच्या वतीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून देण्यात आली आहे. तीन शाळांसाठी कूपनलिका खोदून देण्यासाठी आर्थिक मदत या संस्थेने केली आहे.



रोटरी दिशा ट्रस्ट, डोंबिवली यांच्या माध्यमातून भिवपुरी रोड रेल्वे स्टेशन जवळील चिंचवली येथील मतिमंद शाळेतील मुलांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून देण्यात आली आहे. त्यांनी कूपनलिका खोदून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली असून तब्बल दोन इंच इतके मुबलक पाणी त्या कूपनलिकेत साठून आहे.

रोटरी दिशा ट्रस्टच्या माध्यमातून झुगरेवाडी आणि मेंगाळवाडी शाळेत देखील कूपनलिका खोदून घेण्यात आली आहे. भर उन्हाळ्यातही या कूपनलिका मुळे मोठा आधार विद्यार्थ्यांना झाला आहे.

# फिफा वर्ल्डकपमध्ये मोठा उलटफेर

## केप व्हर्डेने स्पेनला गोलशून्य बरोबरीत रोखले



**अटलांटा : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकपच्या ग्रुप ‘एच’च्या सलामीच्या सामन्यात फुटबॉल जगतातील सर्वात मोठा उलटफेर पहायला मिळाला. युरोपियन चॅम्पियन आणि माजी विश्वविजेत्या स्पेनला वर्ल्डकपमध्ये पहिल्यांदाच पाऊल ठेवणाऱ्या केप व्हर्डे संघाने ०–० अशा ऐतिहासिक बरोबरीत रोखले. अटलांटा येथील मर्सिडीज–बेंझ स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात केप व्हर्डेच्या अभेद्य बचावाने इतिहास रचला.

सामन्यात सुरुवातीपासूनच स्पेनने अपेक्षेप्रमाणे चेंडूवर नियंत्रण राखले. त्यांनी केप व्हर्डेच्या गोलपोस्टवर एकूण २३ शॉटस् मारले, यातील आठ शॉटस् ऑन–टार्गेट होते, मात्र केप व्हर्डेच्या बचाव फळीने स्पेनला गोल करू दिला नाही. लोपेस आणि बॉर्जेस यांनी उत्कृष्ट टॅकल करत स्पेनचे आक्रमण निष्प्रभ केले.

### वोझिन्हा ठरला अभेद्य भिंत

केप व्हर्डेचा कर्णधार आणि ४० वर्षीय गोलकीपर वोझिन्हा या सामन्याचा खरा हिरो ठरला. त्याने स्पेनचे तब्बल आठ मोठे गोलचे प्रयत्न हाणून पाडले. पहिल्या हाफमध्ये त्याने फेरान टॉरेसचे सलग तीन प्रयत्न अपयशी ठरवले. यामाल आणि ओल्मोची रणनीतीदेखील स्पेनला काहीच यश मिळवून देऊ शकली नाही.

# राज्यस्तरीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेत रायगडची दमदार कामगिरी

## १९ सुवर्णांसह तिसरा क्रमांक



**नागोठणे : बातमीदार**

नाशिक येथे नुकत्याच झालेल्या १६व्या राज्यस्तरीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या खेळाडूंनी १९ सुवर्ण, १२ रौप्य आणि आठ कांस्य अशी एकूण ३९ पदके मिळवून राज्यात तिसऱ्या क्रमांक पटकावला.

इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशनतर्फे नाशिक तपोवन येथील सर्वेश्वर महादेव ट्रस्टच्या इनडोअर हॉलमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राच्या २२ जिल्ह्यांतील सुमारे ४३० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास भारतीय जनता युवा मोर्चा नाशिक महानगर अध्यक्ष अमोल पाटील, इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवले, रायगड जिल्हा सचिव धनंजय जगताप, सुरेखा येवले यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेत ठाणे जिल्ह्याने ३५ सुवर्ण, १० रौप्य व तीन कांस्य पदके जिंकून प्रथम क्रमांक मिळवला, तर सांगली जिल्ह्याने २३ सुवर्ण, आठ रौप्य व सहा कांस्यपदकांसह द्वितीय स्थान पटकावले.

**रायगडातील पदक विजेते**

सुवर्ण : रियांश सारले, जय गोळे, श्रीशा रेवले, शौर्य वाघमारे, श्रीयश शेडगे, प्रांजळ खारपुडे, प्रीत माळी, राकेश पवार, शिवशांत सारगे, अनिश पालकर, नेहा दोरे, श्रेयश शेडगे, रोहित गायकवाड, अनुज सरनाईक.

रौप्य : मयंक नाकटे, हर्ष पाटील, सर्वांश सारले, शौर्य धसाडे, जय कुलकर्णी, प्रांजळ खारपुडे, अनिश पालकर, पीयूष साळुंखे, ओमकार साळुंखे, श्रेयश शेडगे, प्रशांत सारगे, रोहित गायकवाड.

कांस्य : हनी मोदी, श्रीयश शेडगे, शौर्य धसाडे, अभिरूद्र प्रताप राय, आदर्श पटेल, अंश म्हात्रे, अर्णव वादळ, प्रशांत सारगे, जय गोळे.



# राज्य बॉक्सिंग स्पर्धेत पनवेलच्या खेळाडूंची चमक

**पनवेल : वार्ताहर**

जळगाव येथे नुकत्याच पार पडलेल्या प्रतिष्ठित महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग स्पर्धेत पनवेलमधील एमपीएसए बॉक्सिंग क्लबच्या खेळाडूंनी यशाची मोहोर उमटवली आहे. या चमूने स्पर्धेत घवघवीत यश संपादन करत विविध पदकांची कमाई केली आहे.

एमपीएसए क्लबच्या सई कारंडे आणि विहंग पालवे यांनी सुवर्णपदक पटकावले. त्याचप्रमाणे बतुल साखरवाला हिने रौप्यपदक, तर अहाना सोमण हिने कांस्यपदक जिंकले. या सुवर्ण यशासोबतच सईची आगामी राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंना प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ तसेच रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा नुकतीच नवीन पनवेल येथे झाली. या स्पर्धेला विविध गटांमध्ये खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

नवीन पनवेल सेक्टर १८ येथील सिडको समाजमंदिरात शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा खेळली गेली. स्पर्धेचे चीफ रेफरी म्हणून डी.आर. साळसकर, शामल आणि योगेश पवार यांनी जबाबदारी सांभाळली. विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.



**गटनिहाय विजेते**

नवोदित : मुली–प्रथम इरा डाडवाल, द्वितीय अनुष्का जाधव, तृतीय स्नेहा जाधव व आध्या आनंद, मुले–प्रथम आराध्य पार्टे, द्वितीय मानस वर्तक, तृतीय कुशाग्र सिन्हा व जस्तेज सिंग; ११ वर्षांखालील : मुली–प्रथम अनुष्का जाधव, द्वितीय भूमिका नेटकर, मुले–प्रथम विहान मंदार पुरोहित, द्वितीय रियान म्हात्रे, तृतीय कुशाग्र सिन्हा; १३ वर्षांखालील : मुली–प्रथम धृती गोयल, द्वितीय आराध्या धेंडे, तृतीय आराध्या शेट्टी, मुले–प्रथम अद्वैत पाटील, द्वितीय विहान अंबास्था, १५ वर्षांखालील : मुली–प्रथम त्रिशा पावशे, द्वितीय अर्निशा भावर, मुले–प्रथम आदित्य जोग, द्वितीय नील राठोड; १७ वर्षांखालील : मुली–प्रथम त्रिशा पावशे, द्वितीय अर्निशा भावर, मुले–प्रथम सोहम तावडे, द्वितीय पार्थ बगौली; १९ वर्षांखालील : मुली–प्रथम अर्निशा भावर, द्वितीय त्रिशा पावशे, मुले–प्रथम नील राठोड, द्वितीय रेयांश साहू; पुरुष खुला गट : प्रथम पियंकुश बोस, द्वितीय लोकेश पाटवा, तृतीय अतुल देशमुख व स्नेहील सारंगी; महिला खुला गट : प्रथम सुषमा मोगरे, द्वितीय त्रिशा पावशे, पुरुष ज्येष्ठ गट : प्रथम लोकेश पाटवा, द्वितीय मनीष सकलानी.



# भारतीय महिला हॉकी संघाची जपानवर मात

**ऑकलंड : वृत्तसंस्था**

भारतीय हॉकी संघाने ऑकलंडमधील नॉर्थ हार्बर नॅशनल हॉकी सेंटर येथे झालेल्या पूल ‘अ’च्या दुसऱ्या सामन्यात जपानला २–१ने पराभूत केले. या विजयासह संघाने न्यूझीलंड एफआईएच हॉकी महिला नेशंस कपच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

या निर्णायक सामन्यात भारतीय कर्णधार सलीमा टेटेने ३३व्या मिनिटाला गोल करून आपल्या संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर लालरेम्सियामीने ४९व्या मिनिटाला गोल करून विजय निश्चित केला. जपानकडून झालेला एकमेव गोल हिरामित्सूने ३५व्या मिनिटाला केला.

अमेरिका आणि जपानवरील विजयानंतर या विजयामुळे भारत सहा गुणांसह अ गटात अव्वल स्थानी पोहचला आहे. स्पर्धेतील अ गटातील भारताचा अंतिम सामना १८ जून रोजी उरुग्वेविरुद्ध होणार आहे.

# वैभव सूर्यवंशीवर कारवाईची टांगती तलवार

**दांबुला : वृत्तसंस्था**

इंडिया–ए आणि श्रीलंका–ए यांच्यातील त्रिकोणी मालिकेदरम्यान झालेला वाद सध्या क्रीडाविश्वात चर्चेचा विषय ठरला आहे. या सामन्यात श्रीलंकेच्या खेळाडूशी झालेल्या धक्काबुक्कीनंतर १५ वर्षांचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीवर कारवाईची टांगती तलवार आहे.



या वादाचे मुख्य केंद्र ‘आर्टिकल २.१२’ आहे. या नियमानुसार कोणत्याही खेळाडूने दुसऱ्या खेळाडूशी किंवा अधिकाऱ्याशी ‘अनुचित शारीरिक संपर्क’ करणे हा गुन्हा मानला जातो. सामान्यतः आयसीसी अशा ए–टीम मालिकांमधील शिस्तभंग प्रकरणांत थेट हस्तक्षेप करत नाही, कारण या मालिकांसाठी अधिकृत आयसीसी मॅच ऑफिशियल्स नियुक्त केलेले नसतात.

नियमांनुसार जेव्हा एखादा खेळाडू २४ महिन्यांच्या कालावधीत चार डिमेरिट पॉइंट्स जमा करतो, तेव्हाच त्याला बंदीची शिक्षा दिली जाते. ते लक्षात घेता वैभवला त्वरित बॅन मिळण्याची शक्यता अत्यंत कमी आहे.

या प्रकरणाला ‘लेव्हल १’ अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई मानल्यास वैभवला कडक फटकार दिली जाऊ शकते किंवा त्याच्या मॅच फीच्या ५० टक्क्यांपर्यंत दंड आकारला जाऊ शकतो.

### मैदानावर काय घडले?

इंडिया–ए आणि श्रीलंका–ए यांच्यातील सुपर ओव्हर सामन्याच्या निकालानंतर मैदानावर तणावाचे वातावरण होते. सामन्यानंतर श्रीलंकेच्या खेळाडूंनी केलेल्या चिथावणीखोर टिप्पण्यांमुळे वैभवचा संयम सुटला आणि वादावादी होऊन धक्काबुक्की झाली. तथापि, या वादात श्रीलंकेच्या इतर खेळाडूंनी वेळीच हस्तक्षेप केल्याने प्रकरण शांत झाले.

# स्वीडनचा ट्युनिशियावर दणदणीत विजय

**मॉन्टेरी (मेक्सिको) : वृत्तसंस्था**

यासिन अयारीच्या शानदार कामगिरीच्या जोरावर स्वीडनने फिफा विश्वचषक मोहिमेत ट्युनिशियाचा ५–१ असा धुव्वा उडवत धडाकेबाज सुरुवात केली. ग्रुप ‘एफ’मधील या सलामीच्या सामन्यात स्वीडनने यासह विश्वचषकातील आपले सलामीचे सामने अपराजित राखण्याची मालिका सलग पाच सामन्यांपर्यंत वाढवली आहे.

ग्रॅहम पॉटर यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या स्वीडनने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला. पहिल्या ३० मिनिटांतच दोन गोल डागत स्वीडनने सामन्यावर पूर्ण पकड मिळवली. रिबाऊंड झालेला चेंडू यासिन अयारीच्या पायाशी आल्यानंतर त्याने कोणतीही चूक न करता रिकाम्या जाळीत चेंडू ढकलून स्वीडनचे खाते उघडले. यानंतर ३०व्या मिनिटाला ग्योकेरेसच्या पासवर अलेक्झांडर इसाकने उत्कृष्ट काऊंटर अॅटॅक साकारत ट्युनिशियाच्या गोलकीपरला चकवले आणि संघाची आघाडी २–० अशी मजबूत केली.



दोन गोलने पिछाडीवर पडल्यानंतरही ट्युनिशियाने झुंजार खेळ केला. मध्यंतराच्या ठीक आधी, हॅनिबल मेजब्रीने मारलेल्या सुरेख क्रॉसवर ओमर रेकिकने हेडरद्वारे शानदार गोल करत ट्युनिशियाचे पुनरागमन करून दिले. यामुळे पूर्वार्धात धावसंख्या २–१ अशी झाली, मात्र ६०व्या मिनिटाला ग्योकेरेसने कोणतीही चूक न करता चेंडू थेट गोलपोस्टमध्ये धाडला आणि स्वीडनला ३–१ अशी आघाडी मिळवून दिली. ग्योकेरेसने स्वीडनसाठी खेळलेल्या शेवटच्या १६ सामन्यांत तब्बल १५ गोल केले आहेत.

शेवटच्या टप्प्यात मॅटियास स्वानबर्गने पेनल्टी बॉक्समधून सुरेख गोल करत स्वीडनला ४–१ने पुढे नेले. यानंतर यासिन अयारीने बॉक्सच्या बाहेरून एक थेट आणि वेगवान शॉट मारत स्वतःचा दुसरा गोल पूर्ण केला आणि स्वीडनच्या ५–१ अशा विजयावर शिक्कामोर्तब केले.

# स्मृती मानधना रोनाल्डो, मेस्सीच्या पंक्तीत

## टाइमच्या मासिकाकडून प्रभावशाली खेळाडूंच्या यादीत स्थान



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार आणि धडाकेबाज सलामीवीर स्मृती मानधना हिने जागतिक स्तरावर भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. प्रसिद्ध टाइमच्या मासिकाने जाहीर केलेल्या २०२६मधील क्रीडा विश्वातील १०० सर्वात प्रभावशाली खेळाडूंच्या यादीत स्मृती मंधानाचा समावेश करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, या संपूर्ण यादीत स्थान मिळवणारी स्मृती एकमेव भारतीय खेळाडू ठरली आहे. या यादीत स्मृतीने ख्रिस्तियानो रोनाल्डो, लिओनेल मेस्सी आणि टेनिस स्टार कार्लोस अल्काराझ यांसारख्या जागतिक महानायकांच्या पंक्तीत स्थान मिळवले आहे.

टाइम मासिकाच्या या क्रीडा यादीत जगभरातील दिग्गज अॅथलिट्स, प्रशिक्षक आणि गुंतवणूकदारांचा समावेश आहे. संपूर्ण क्रिकेटविश्वातून केवळ दोनच खेळाडूंना यात स्थान मिळाले आहे. यामध्ये पहिली भारताची स्मृती मंधाना आणि दुसरा दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट कर्णधार टेम्बा बावुमा आहे.

# अशोक शर्माचा भारत ‘अ’ संघात समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत अ संघ सध्या श्रीलंकेत सुरू असलेली तिरंगी मालिका खेळत आहे. श्रीलंका अ, अफगाणिस्तान अ आणि भारत अ हे देश या तिरंगी मालिकेत खेळत आहेत. सलग दोन पराभव आणि वैभव सूर्यवंशीच्या श्रीलंकन खेळाडूंशी झालेल्या वादानंतर बीसीसीआयने संघात मोठा बदल केला आहे.



बीसीसीआय निवड समितीने युधवीर सिंगच्या जागी अशोक शर्मा’चा ‘भारत अ’ संघात समावेश केला आहे. हा संघ सध्या श्रीलंकेत तिरंगी मालिका खेळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार १३ जून रोजी गोलंदाजी करताना युधवीरला उजव्या खांद्यामध्ये वेदना जाणवल्या. याआधी ११ जून रोजी क्षेत्ररक्षणाच्या सराव सत्रादरम्यानही त्याला अशाच पद्धतीने त्रास होत होता.

बीसीसीआयन पुढे म्हटले की, सल्लामसलत केल्यानंतर वैद्यकीय पथकाने युधवीरला दुखापतीतून पूर्ण बरे होण्यासाठी सेंटर ऑफ एक्सलन्सच्या देखरेखीखाली टप्प्याटप्प्याने पुनर्वसन करण्याचा सल्ला दिला आहे.

अशोक शर्माने या आयपीएलमध्ये सहा सामन्यांत सहा बळी घेतले. विकेट्सची संख्या कमी असली तरी त्याने आपल्या भेदक गोलंदाजीने सर्वांची मने जिंकली आहेत.

# एकाच दिवशी खेळलेले सर्व सामने झाले ड्रॉ!

## ६८ वर्षांनंतर फिफा विश्वचषकात पहिल्यांदाच असे घडले

**लॉस एंजेलिस : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेत १५ जून रोजी फुटबॉल जगताला एका अभूतपूर्व आणि ऐतिहासिक क्षणाचा अनुभव आला. विश्वचषकाच्या इतिहासात तब्बल ६८ वर्षांनंतर पहिल्यांदाच एकाच दिवशी खेळले गेलेले सर्वच्या सर्व चारही सामने अनिर्णित ठरले.

फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेत केप वर्डे विरुद्ध स्पेन (०–०), बेल्जियम विरुद्ध इजिप्त (१–१), सौदी अरेबिया विरुद्ध उरुग्वे (१–१) आणि इराण विरुद्ध न्यूझीलंड (२–२) याच्यांत लढत पाहायला मिळाली. विशेष म्हणजे, हे चारही सामने अनिर्णित ठरले आहेत.



फिफा विश्वचषकाच्या इतिहासात एकाच दिवशी खेळले गेलेले सर्व सामने अनिर्णित ठरण्याची ही केवळ दुसरी वेळ आहे. यापूर्वी असा योग १५ जून १९५८ रोजी म्हणजेच तब्बल ६८ वर्षांपूर्वी स्वीडनमध्ये झालेल्या विश्वचषकात आला होता. विशेष म्हणजे, १९५८ आणि २०२६मधील या दोन्ही ऐतिहासिक घटना एकाच तारखेला म्हणजेच १५ जून रोजी घडल्या आहेत, ज्यामुळे हा योगायोग अधिकच रंजक बनला आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com